रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३०७
www.ramprahar.com

शुक्रवार, २६ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

पेण बाजार समितीवर प्रथमच सभापतीपदी महिला/२
विकासाला विरोध नाही, पण आधी मोबदला द्या!/५
आयपीएलमध्ये आज दुसऱ्या क्वालिफायरचा थरार/८

## आता शेतीसाठी दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा



**सोलापूर** : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतीसाठीच्या वीजपुरवठ्याबाबत मोठी घोषणा केली. शेतीसाठी दिवसा १२ तास अखंडित वीज देऊ, असे त्यांनी जाहीर केले आहे. ते गुरुवारी (दि. २५) सोलापूरमध्ये भाजप सोलापूर शहर व ग्रामीण जिल्हा संकल्प महाविजय कार्यकर्ता संमेलनात बोलत होते. उपमुख्यमंत्री म्हणाले, आम्ही मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी ही क्रांतिकारी योजना आणली आहे. त्यात आपण कृषीवाहिन्या सोलरवर कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा १२ तास अखंडित वीज देणार आहोत. यातील दुसरे क्रांतिकारी पाऊल म्हणजे सोलर फीडर तयार करण्यासाठी सरकारी जमीन नसेल, तर आम्ही शेतकऱ्यांची खासगी पडीक जमीन ३० वर्षांसाठी भाडेतत्वावर घेऊ. सरकारच्या या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

# बारावीत यंदाही कोकण अव्वल!

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल ९१.२५ टक्के लागला आहे. विभागनिहाय निकालाची टक्केवारी पाहता कोकण विभाग अव्वल स्थानी (९६.०१ टक्के) आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या निकालातही मुलींनी बाजी मारली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीची परीक्षा यंदा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली. राज्यात एकूण १४,१६,३७१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी १२,९२,४६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या वर्षी ९३.७३ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत, तर उत्तीर्ण होणाऱ्या मुलांचे प्रमाण ८९.१४ टक्के आहे. म्हणजे परीक्षा देणाऱ्या मुलांपेक्षा ४.५९ टक्के अधिक मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

मार्च-एप्रिल २०२२चा बारावीचा निकाल ९४.२२ टक्के इतका होता. फेब्रुवारी-मार्च २०२३चा निकाल ९१.२५ टक्के आहे. त्यामुळे मार्च-एप्रिल २०२२च्या तुलनेत या वर्षी निकाल २.९७ टक्के कमी आहे. तथापि फेब्रुवारी-मार्च २०२०च्या निकालाची तुलना करता फेब्रुवारी-मार्च २०२३चा निकाल ०.५९ टक्के वाढला आहे. १५४ विषयांपैकी २३ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

निकाल जाहीर झाल्यानंतर २६ मेपासून ५ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी संकेतस्थळावर अर्ज करता येईल. उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी २६ मे ते १४ जूनदरम्यान ऑनलाईन अर्ज करता येणार आहे, तर गुणपत्रिका ५ जून रोजी महाविद्यालयात मिळणार आहे.

## निकालात मुलींची बाजी



(छाया : जितू शिगवण)

**विभागनिहाय टक्केवारी**

| | | |
|---|---|---|
| कोकण | : | ९६.०१ |
| पुणे | : | ९३.३४ |
| कोल्हापूर | : | ९३.२८ |
| अमरावती | : | ९२.७५ |
| औरंगाबाद | : | ९१.८५ |
| नाशिक | : | ९१.६६ |
| लातूर | : | ९०.३७ |
| नागपूर | : | ९०.३५ |
| मुंबई | : | ८८.१३ |

**राज्याचा एकूण निकाल : ९१.२५**

### शाखानिहाय निकाल

*विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.०९, कला शाखेतील विद्यार्थ्यांची टक्केवारी ८४.०५, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची टक्केवारी ९०.४२, तर व्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ८९.२५ इतकी आहे.*

# एकटे मोदीजी सगळ्यांवर भारी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधात सध्या विरोधी पक्षांतील नेत्यांच्या भेटीगाठी सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी एकटेच सगळ्यांवर भारी आहेत, असे म्हणत विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. ते गुरुवारी (दि. २५) रत्नागिरी दौऱ्यात पत्रकारांशी बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, यापूर्वीही सगळे विरोधी पक्ष एकत्र आले होते. लोकशाहीत सर्वांना भेटण्याचा, एकत्र येण्याचा अधिकार आहे, परंतु शेवटी मतदान जनता करते. गेल्या वेळचा अनुभव आपल्याकडे आहे. २०१४पेक्षा २०१९मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजप युतीला अधिक जागा मिळाल्या. त्या वेळचा माहोल आपण पाहिला आहे. सगळे विरोधक पालापाचोळ्यासारखे उडून गेले आणि पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली बहुमत आले. त्यांचे काम बोलते. विरोधक कितीही एकत्र आले तरी एकटे मोदीजी सर्वांवर भारी आहेत.

संपूर्ण जगात आपल्या देशाचे नाव मोठे करण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले आहे. इतर देशांची अर्थव्यवस्था डबघाईला आलेली असताना भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नंबरवर आणण्याचे काम मोदीजींनी केले. भारत हा पुढे जातोय, महासत्तेकडे जातोय याचीच पोटदुखी सुरू आहे, मात्र याचा जनतेच्या मनावर परिणाम होत नाही. विरोधी पक्ष जेवढे मोदीजींच्या विरोधात बोलतील, एकत्र येतील तेवढी जनता त्यांना त्यांची जागा २०२४मध्ये ताकदीने दाखवेल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी स्पष्ट केले.



### 'मविआ'मध्ये मारामारी

नाना पटोलेंचाही भावी मुख्यमंत्री असा बॅनर लागला आहे, याबाबत या वेळी मुख्यमंत्र्यांना विचारण्यात आले. त्यावर ते म्हणाले, हे चांगलेच आहे. प्रत्यक्ष नाही बॅनरवर तर उल्लेख होतो. त्यांच्यात चढाओढ सुरू आहे. त्यांना आनंद घेऊ द्या. एक उमेदवार आधी निश्चित केला पाहिजे, पण उमेदवारीपासूनच मारामारी आहे. महाराष्ट्रातील जनता सुज्ञ आहे. अडीच वर्षे महाविकास आघाडी सरकार झोपले होते, घरी बसले होते. मग जनता कोणाच्या बाजूने उभी राहिल.

## मुंबई विभागात रायगड जिल्हा सरस

**अलिबाग** : बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्यातील ९१.९४ टक्के विद्यार्थी उर्तीण झाले आहेत. गेल्या वर्षी ९३.११ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. यंदा दोन टक्क्यांनी निकाल घसरला आहे. तरीदेखील रायगडने मुंबई विभागात अव्वल स्थान मिळवले आहे. जिल्ह्यात तळा तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९७.३० टक्के लागला आहे.

रायगड जिल्ह्यातून ३० हजार ५८३ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. त्यापैकी २८ हजार १२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदाही मुलांपेक्षा मुली अधिक संख्येने उत्तीर्ण झाल्या. ८९.५७ टक्के मुले, तर ९४.४८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

**तालुकानिहाय टक्केवारी**

तळा ९७.३०, पनवेल ९६.५८, म्हसळा ९४.७५, उरण ९३.२४, माणगाव ९४.६२, श्रीवर्धन ९४.५३, रोहा ९२.६५, अलिबाग ९१.४१, पेण ८९.६७, पोलादपूर ८८.२१, महाड ८७.५१, कर्जत ८६.३८, खालापूर ८२.९३, सुधागड ८२.४२, मुरुड ८१.२८.

## कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजचा १०० टक्के निकाल

**पनवेल** : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत श्रेयश गजानन नाळे याने ८५.६६ टक्के, तर वाणिज्य शाखेत देवदिप दिनेश त्रिपाठी याने ८४.५० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविला. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळा कमिटी चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. **(सविस्तर वृत्त पान ३ वर..)**



**रत्नागिरी : शासन आपल्या दारी या महत्त्वाकांशी उपक्रमाचा एक भाग म्हणून जिल्हा पोलीस दलाला देण्यात आलेल्या वाहनांचे लोकार्पण गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. कृषीमंत्री दादा भुसे, पालकमंत्री उदय सामंत आदी सोबत होते.**





**पनवेल** : दुबईच्या धर्तीवर न्हावेखाडी येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी रामबाग साकारली आहे. या रामबाग परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या शौचालयाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. या वेळी भाजप नेते चंद्रकांत घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य व रामबाग व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष सागर ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, सी. एल. ठाकूर, राम मोकल, सदाशिव ठाकूर, जी. के. ठाकूर, शिवाजी ठाकूर, गोपीचंद ठाकूर, हरेश्वर कडू, शंभो ठाकूर, अनंता ठाकूर, नरेश मोकल, रूपेश मोकल, अनंता कडू, तुकाराम मोकल आदी उपस्थित होते.

## मुंबईत झोपडीधारकांना अडीच लाखांमध्ये घर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मोठा निर्णय घेत मुंबईतील १ जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ या काळातील झोपडीधारकांना मोठा दिलासा दिला आहे. मुंबईत झोपडीच्या बदल्यात झोपडीधारकांना सशुल्क घर मिळणार आहे. या निर्णयाचा लाखो झोपडीधारकांना फायदा होणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहनिर्माण खात्याची जबाबदारी आहे. त्यांच्या अखत्यारीत असलेल्या विभागाने हा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने याबाबत परिपत्रक जाहीर केले आहे. यानुसार मुंबईत झोपडीच्या बदल्यात अवघ्या दोन लाख ५० हजार रुपयांत घर मिळणार आहे. यामुळने लाखो झोपडपट्टीवासीयांच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. शिवाय झोपडपट्टी असलेल्या जागांचा विकास होणार आहे. या नव्या योजनेतील लाभार्थी झोपडपट्टीवसीयांच्या अटी व शर्थी निश्चित करण्यासाठीची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे.

# देशातील पहिल्या 'एआय' विद्यापीठाला मंजुरी

**पनवेल : वार्ताहर**

राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याने आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (मानवनिर्मित बुद्धिमत्ता) प्रेरित शिक्षण देणाऱ्या भारतातील पहिल्या विद्यापीठाला अंतिम मंजुरी दिली आहे. या विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे युनिव्हर्सल एआय विद्यापीठ कार्यान्वित झाल्याची माहिती अधिसूचनेद्वारे जारी देण्यात आली आहे.

एआय क्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर स्पेशलाइझ्ड अभ्यासक्रम देऊ करणारे युनिव्हर्सल एआय हे भारतातील पहिले विद्यापीठ आहे. राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण खात्याने या विद्यापीठाला मंजुरी दिली होती व तसे पत्र २५ जानेवारी २०२३ रोजी पाठवले होते. आता विद्यापीठ कार्यान्वित करण्यासाठीही सरकारने मंजुरी दिली आहे. या विद्यापीठाचे पहिले शैक्षणिक वर्ष १ ऑगस्ट २०२३पासून सुरू होणार आहे.



युनिव्हर्सल एआय विद्यापीठाचे कुलपती व संस्थापक प्रा. तरुणदीप सिंग आनंद घोषणेच्या वेळी म्हणाले की, २१व्या शतकातील सार्वत्रिक कौशल्यांचे शिक्षण देणारे भारतातील पहिले समर्पित एआय विद्यापीठ देशाच्या व राज्याच्या वाढ आणि विकासातील एक महत्त्वपूर्ण प्रेरक घटक ठरणार आहे. **(पान २ वर..)**

### कर्जत येथे ग्रीन कॅम्पस

*एआय प्रेरित शिक्षणाला समर्पित पहिले विद्यापीठ म्हणून नवीन युनिव्हर्सल एआय विद्यापीठ हे आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या क्षेत्रातील खास विकसित करण्यात आलेले अभ्यासक्रम देऊ करेल. विद्यापीठाने कर्जत येथे ग्रीन कॅम्पस तयार केला आहे. एआय व फ्युचर टेक्नोलॉजीजमधील (भविष्यकालीन तंत्रज्ञानातील) विशेष पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम विकसित केले आहेत तसेच लिबरल आर्ट्स व ह्युमॅनिटीज, ग्लोबल अफेअर्स व डिप्लोमसी, कायदा, पर्यावरण व शाश्वतता आणि क्रीडाविज्ञान आदी विषयांवरील आधुनिक अभ्यासक्रमही विद्यापीठाने तयार केले आहेत.*



# कृषीपूरक अभ्यासक्रमास प्राधान्य द्यावे

## मुख्यमंत्र्यांची सूचना; रत्नागिरीत कौशल्य विकास केंद्राचे लोकार्पण

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य हे कृषीप्रधान राज्य आहे. शेतकऱ्यांचे जीवन सुखकारक करण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. शासकीय तंत्रनिकेतन परिसरात कौशल्य विकास केंद्रामार्फत सुमारे २० विविध अभ्यासक्रम राबविले जातात. कृषी पूरक अभ्यासक्रम सुरू करण्याला या केंद्राने प्राधान्य द्यावे, अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने शासकीय तंत्रनिकेतन संस्थेच्या परिसरात निर्माण करण्यात आलेल्या कौशल्य विकास केंद्राचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पालकमंत्री उदय सामंत, कृषी मंत्री दादाजी भुसे उपस्थित होते.



अर्धा एकर परिसरात केवळ सात महिन्यांत उभारण्यात आलेल्या या इमारतीचे कौतुक करून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राज्यातील युवकांसाठी उद्योगधंद्यांच्या गरजानुसार विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. या केंद्रातून अनेक गुणवंत विद्यार्थी निर्माण होतील, असा आशावादही त्यांनी या वेळी व्यक्त केला. प्रारंभी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक प्रमोद नाईक यांनी संस्थेच्या विविध अभ्यासक्रम व उपक्रमाबाबत मुख्यमंत्र्यांना माहिती दिली. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी अत्यंत आत्मियतेने उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनींशी संवाद साधला.

या वेळी शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य औदुंबर जाधव, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज खंते, कौशल्य विकास केंद्राच्या प्राचार्य गौरीनंदा सावंत, कौशल्य विकास केंद्राचे अभ्यास प्रमुख अक्षय पाटील यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेतर वर्ग उपस्थित होता.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकार संवेदनशील –माधव भांडारी

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आलेला असताना राज्यातील शेतकऱ्यांच्या गरजांची जाणीव ठेवून शेतकऱ्यांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडविण्याबाबत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांचे प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी स्वागत केले आहे. शेतकऱ्यांना वेळेवर दर्जेदार खते, बियाणे मिळावे यासाठी राज्य सरकारने आखलेल्या योजनांबरोबरच, पीक कर्जे देण्यास अडवणूक करणाऱ्या बँकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हिताचे धाडसी पाऊल उचलले आहे, असे भांडारी म्हणाले.




भाजप प्रदेश कार्यालयात गुरुवारी (दि. २५) झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, माध्यम विभाग सहसंयोजक ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

भांडारी यांनी या बैठकीतील शेतकरी हिताच्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती देऊन राज्य सरकारचे अभिनंदन केले. आगामी खरीप हंगामासाठी शेतकरी हितार्थ विविध उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना दर्जेदार बी-बियाणे, खते मिळावीत यासाठी कृषी विभागाची गुणवत्ता नियंत्रण पथके सज्ज होत आहेत. शेतकऱ्यांच्या कोणत्याही तक्रारींचे तातडीने निवारण केले जाणार आहे. यंदा प्रथमच शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शनासाठी राज्यातील कृषी विद्यापीठांचीही कृषी खात्यास साथ मिळणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

बोगस बियाणे, आणि निकृष्ट दर्जाची खते विकणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करून प्रसंगी त्यांचे परवानेही रद्द करण्याचे तसेच शेतकऱ्यांची कृषी कर्जासाठी अडवणूक करणाऱ्यांविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामुळे पीक कर्ज वितरणाला गती मिळेल व शेतकऱ्यास मोठा आर्थिक दिलासा मिळेल, असा विश्वास भांडारी यांनी व्यक्त केला.

# महाड तेटघर येथे जलजीवन मिशनचे भूमिपूजन

**महाड : प्रतिनिधी**

जलजीवन मिशन योजना महाड तालुक्यात प्रभावीपणे राबवून तालुका पाणीटंचामुक्त करण्याचा उद्देश सफल होणार आहे. नुकतेच आमदार भरत गोगावले यांनी तेटघर या गावच्या जलजीवन योजना व इतर विकासकामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. २४) केले.

भाजप-शिवसेना युतीच्या काळात महाड तालुक्यात निधी देताना झुकते माप दिले जात असून रायगड प्राधिकरण, जलजीवन मिशन, जिल्हा नियोजन, महामार्ग विभाग अशा अनेक विभागाकडून हजारो करोड रुपयांची कामे सुरू आहेत.

आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते तेटघर गावातील



जलजीवन मिशन पाणीयोजना ८० लक्ष, बौद्धवाडी रस्ता १५ लक्ष व अंगणवाडी इमारत ११ लक्ष रुपयांच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी तालुका प्रमुख सुरेश महाडीक, विजय सावंत, भाजप तालुका सरचिटणीस महेश शिंदे, उपतालुकाध्यक्ष चंद्रजित पालांडे, बंधु तरडे प्रकाश खेडेक, सरपंच रक्षा मोरे, उपसरपंच रविंद्र पालांडे सह भाजपा शिवसेना कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या जलजीवन मिशन माध्यमातून हर घर नल योजनेमुळे संपूर्ण महाड तालुका भविष्यात पाणीटंचाईमुक्त होईल, असा विश्वास आमदार गोगावले यांनी व्यक्त केला.

# पेण बाजार समितीवर प्रथमच सभापतीपदी महिला

## जयप्रभा म्हात्रे यांची बिनविरोध निवड

**पेण : प्रतिनिधी**

पेण कृषी उत्पन्न बाजार समितीची सभापतीपदाची निवडणूक गुरुवारी (दि. २५) झाली. या वेळी भाजपप्रणीत शेतकरी सहकारी पॅनेलतर्फे सभापतीपदासाठी जयप्रभा प्रफुल्ल म्हात्रे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला, तर उपसभापतीपदासाठी नितीन अंबाजी पाटील यांचाही एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष काळे यांनी सभापती आणि उपसभापती पदाचे दोन्ही उमेदवार बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

गेली अनेक वर्षे बिनविरोध निवड होणारी पेण कृषी बाजार समिती निवडणूक या वेळीही



बिनविरोध झाली.

माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी या निवडणुकीत आपल्या भाजप शेतकरी सहकारी पॅनलचे १७ संचालक निवडून आणले होते. त्यानुसार प्रथम महिला सभापती म्हणून जयप्रभा प्रफुल्ल म्हात्रे यांची आमदार धैर्यशील पाटील यांनी निवड करून महिलांचा सन्मान केला आहे. उपसभापती म्हणून नितीन अंबाजी पाटील यांना संधी देण्यात आली आहे.

सभापती जयप्रभा म्हात्रे व उपसभापती नितीन पाटील यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुष्पगुच्छ देऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी जि. प. अध्यक्ष नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जि. प. सदस्य डि. बी. पाटील, माजी जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष रघुनाथ दळवी, भाजपचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवनिर्वाचित संचालक, सरपंच व समर्थक कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून पेढे वाटून आनंद साजरा केला.

# माणगावच्या निकम कॉलेजसह सावंत कॉलेजचा १०० टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२३मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेत माणगाव एज्युकेशन ट्रस्ट संचालित एस. एस. निकम ज्युनिअर सायन्स कॉलेजसह जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती सविता नीलकंठ सावंत ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला.

एस. एस. निकम कॉलेजमध्ये स्मित निलेश मेथा या विद्यार्थ्याने ७३.१७ टक्के गुण संपादन करून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. फर्जिन फैसल गाळसुळकर या विद्यार्थिनीने ७२.५० टक्के मिळवून द्वितीय, अल्फीया अब्दुल बासित सनगे ७२.१७ टक्के तृतीय, रूहान अब्दुल रशीद हाजीते ७१.३३ टक्के चतुर्थ क्रमांक, समृद्धी दिलीप जाधव ६९.६७ टक्के संपादन करून पाचवा क्रमांक पटकावला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, संस्थेचे सर्व पदाधिकारी, कॉलेजचे प्राचार्य, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

श्रीमती सविता नीलकंठ सावंत ज्युनिअर कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेत सुप्रिया सुभाष सकपाळ या विद्यार्थिनीने ७४.८३ टक्के गुण संपादन मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला. सलोनी दयानंद पोळेकर ६६.१७ टक्के गुण द्वितीय, उज्ज्वला गणपत पवार ६३ टक्के गुण तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या महाविद्यालयातून यंदा बारावी परीक्षेसाठी एकूण २४ विद्यार्थी बसले होते.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत, अध्यक्ष अण्णासाहेब सावंत, विश्वस्त भाऊसाहेब सावंत, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक, प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी, प्राध्यापक माळी, प्राध्यापक मोरे, दिलीप ढेपे, संजय गायकवाड, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी कर्जतमध्ये आदिवासी एकवटले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी ठाकूर आणि कातकरी समाजातील लोकांच्या प्रलंबित मागण्या आणि समस्यांसाठी बुधवारी (दि. २४) शेकडो आदिवासी बांधवांनी प्रांत कार्यालयावर मोर्चा काढला.

जागृत कष्टकरी संघटनेच्या प्रमुख नॅन्सी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चात संघटनेचे अध्यक्ष केशव वाघमारे, सचिव वसंत पवार, धर्मा निरगुडे, प्रकाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो आदिवासी ठाकूर आणि कातकरी समाजाचे लोक सहभागी झाले होते. पोलीस मैदानातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून पोस्ट ऑफिस असा हा मोर्चा निघाला. प्रांत अधिकारी अजित नैराळे



यांना निवेदन देण्यात आले.

पाथराजमधील नागेवाडी येथील आदिवासींचे ७०बचे सर्व दावे निकाली काढावेत, प्रलंबित वनहक्क दावे तत्काळ मंजूर करावेत, आदिवासींचे सामुहिक जमिनीचे दावे निकाली काढावेत, दळी जमिनीचा स्वतंत्र सातबारा उतारा बनवावा, दळी जमिनीची शासनाने मोजणी करून द्यावी, आदिवासींची घरे असलेली जमीन रहिवाशी आदिवासींच्या नावे करावीत, रेशनवर धान्य द्यावे, वंजारवाडी येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि भूतवली येथील कातकरी वस्तीचे पुनर्वसन करावे तसेच पीक पाणी नोंदी वेळेवर करण्यात याव्यात या मागण्या करण्यात आल्या.

# एचएससी परीक्षेत नेरूळच्या विद्याभवन संकुलाचे सुयश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

फेब्रुवारी २०२३मध्ये घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेत पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाने ९६.६४ टक्के निकाल लागला.

विद्याभवन शिक्षण संकुलाच्या विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमधून एकूण १४९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातील १४४ विद्यार्थी उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाले. गौरी ढाळे हिने ८९.६७ टक्के मिळवून विज्ञान शाखेतून प्रथम आली. स्वाती मांदाडकर आणि हर्षदा आटपाडकरने अनुक्रमे ८७.६७ टक्के आणि ८७ टक्के गुण मिळवत द्वितीय आणि तृतीय आल्या.

वाणिज्य शाखेतून ऋतुजा शिंदे हिने ९०.५० टक्के गुण मिळवत संकुलातून प्रथम येण्याचा मान पटकावला. दिवेश संतोष खंडू ८८ टक्के, रिद्धेश नाईकरे ८८ टक्के द्वितीय तसेच मेघा बालगुडे हिला ८७ टक्के गुण मिळवत तृतीय आले.

पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, मुख्याध्यापक भिमराव आडसूळ तसेच प्रभारी मुख्याध्यापिका राजकुमारी इंदलकर, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वेदांत आंबवणे विज्ञान शाखेतून प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

रिलायन्स फाउंडेशन स्कूल लोधिवली येथील विद्यार्थी वेदांत संजय आंबवणे हा विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून त्याचे अभिनंदन होत आहे.



वेदांत संजय आंबवणे हा चौक गावचा विद्यार्थी असून रिलायन्स फाउंडेशन लोधिवली येथे १२वी विज्ञान शाखेतून परीक्षा देऊन ८४.१७ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चौक गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी त्याचे अभिनंदन केले आहे. पुढे आपण आयटी क्षेत्रात प्रवेश करणार असल्याचे सांगितले. आपल्याला आई-बाबा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले असे सांगितले.

पान १ वरून

## देशातील पहिल्या 'एआय' विद्यापीठाला मंजुरी

जग अधिकाधिक स्वयंचलनाकडे व डिजिटल रूपांतरणाकडे जात असताना जागतिक अर्थव्यवस्थेत देशाला स्पर्धात्मक स्थितीमध्ये राहण्यासाठी एआय शिक्षण, संशोधन महत्त्वाचे आहे. भारताच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाखाली देशातील तरुणांना कौशल्याधारित अभ्यासक्रमांची ओळख करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. याद्वारे २०३५ सालापर्यंत व्यावसायिक किंवा उच्च शिक्षणाच्या पदव्या प्राप्त करता येतील आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत ५०० दशलक्षांची भर पडेल. सध्या एआय क्षेत्रातील संधी जागतिक स्तरावर व भारतात खूप विस्तृत आहेत. सरकारची धोरणेही अनुकूल आहेत. जगातील सर्वोत्तम शिक्षणसंस्थांशी संबंध जोपासून जागतिक करिअर संधी खुल्या करून देणारे व्यापक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यास सज्ज आहोत, असेही प्रा. आनंद म्हणाले.

महावितरण

ई-निविदा सुचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी- २१, टी-२२, टी-२३, टी-२४ आणि टी-२५/(२०२३-२४) अशा पाच निविदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २६.०५.२०२३ पासून ते दि. ०१.०६.२०२३ पर्यंत उपलब्ध राहतील व निविदा भरण्याची अंतिम तारीख दि. ०२.०६.२०२३ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**कार्यकारी अभियंता (स्था.)**
**स्थापत्य विभाग, भांडुप**

महावितरण

जाहीर नोटीस

म.रा.वि.वि.कं.मर्या अंतर्गत कल्याण पुर्व विभागाच्या अधिपत्याखालील उपविभाग ३ अंतर्गत श्री. संतोष तुकाराम शिर्के , निम्नस्तर लिपिक (लेखा) भनिनि क्र. २४४९५२८ हे दिनांक २७.०५.२०२२ पासुन आजपर्यत दिर्घकाळ विनापरवाना गैरहजर आहेत. यासाठी उपविभागाकडून / विभागीय कार्यालयाकडून 4 पत्रे देण्यात आली व त्यानंतर त्यांना काअ/कपुवि/मांस/गोप/८४०/२०२२/१०४९१८/१११३१४ दि. २८.१२.२०२२ अन्वये त्यांना आरोपपत्र देण्यात आले होते परंतु अदयाप पर्यंत संतोष तुकाराम शिर्के हे कामावर हजर झालेले नाहीत व याबाबतीत कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यानंतर मुअ/कपक/मासंवि/प्रा.चौ/गोप/१७१ दि. १५.०३.२०२३ नुसार आपली खातेनिहाय चौकशी दि. २८.०३.२०२३ रोजी कल्याण परिमंडळ कार्यालय येथे नियोजित करण्यात आली होती परंतु आपण चौकशीकामी हजर न राहील्याने चौकशीकामी एकतर्फी निर्णय घेण्यात येवुन मुअ/वव्य/कपक/मासंवि/प्रा.चौ/गोप/१९१ दि. ३१.०३.२०२३ च्या चौकशी अहवालानुसार काअ/कपुवि/मांस/गोप/८४०/२०२२/१०४९१८/११६००० दि. १८/०४/२०२३ नुसारचे कामावरून कमी करणेबाबतचे कारणे दाखवा सुचना पत्र पाठविण्यात आले होते. सदर पत्र ऑनलाईन ट्रकींग सिस्टिम नुसार टपालाव्द्रारे दि. ०८.०५.२०२३ रोजी हस्तातरीत झाल्याचे निदर्शनास येत आहे व सदर पत्राची पोहच पावती टपालव्द्रारे दि. २२.०५.२०२३ रोजी या कार्यालयास प्राप्त झाली आहे. यापुर्वी दि. २७.०४.२०२३ च्या दैनिक वृत्तपत्रामध्ये या आशयाची नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती त्यामध्ये आपणांस सात दिवसाची मुदत देण्यात आली होती तरी आपण अद्यापपर्यंत कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही. सदर जाहीर नोटीस अंतिम असुन ती प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसाचे आत आपण या कार्यालयात हजर न झाल्यास कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील तरतुदीनुसार म.रा.वि.वि.कं.मर्या निम्नस्तर लिपिक (लेखा) या पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी अभियंता,**
**कल्याण पुर्व विभाग**



# पनवेलमध्ये ३३ इमारती धोकादायक

## महापालिकेकडून नोटीस

**पनवेल : वार्ताहर**

अतिवृष्टीत सर्वाधिक धोका हा धोकादायक इमारतींना होत असल्याने पनवेल महापालिकेने सावधगिरीचा पवित्रा घेत पालिका हद्दीतील ३३ धोकादायक मालमत्तांना नोटिसा बजावल्या आहेत. तातडीने या इमारतींतून स्थलांतरित व्हावे तसेच हे बांधकाम मालमत्ताधारकांनी स्वत:हून पाडावे; अन्यथा आपत्तीवेळी होणाऱ्या जीवित आणि वित्त हानीला स्वतः मालमत्ताधारक जबाबदार असतील, असे नोटीशीत म्हटले आहे.


(प्रातिनिधीक छायाचित्र)

पनवेल महपालिका हद्दीत चार वेगवेगळे प्रभाग आहेत. प्रभाग क्रमांक अ, ब, क आणि ड या चारही प्रभागांमध्ये तळोजा परिसर ते खारघर वसाहत हा परिसर प्रभाग क्रमांक अ मध्ये येतो या परिसरात एकही धोकादायक इमारत नाही, असे पालिकेने घोषित केले आहे. कळंबोली परिसर हा प्रभाग क्रमांक ब मध्ये येत असल्याने तेथे पाच धोकादायक इमारती आहेत तसेच या परिसरात पालिकेने धोकादायक अवस्थेत असलेल्या १५ इमारती यापूर्वीच पाडल्या आहेत.

प्रभाग ब मधील २० धोकादायक इमारतींना पालिकेने स्थापन केलेल्या समितीने धोकादायक म्हणून घोषित केले आहे. तसेच पालिकेच्या प्रभाग क्रमांक क मध्ये कामोठे परिसर येतो. या प्रभागात आठ धोकादायक इमारती आहेत. सर्वाधिक धोकादायक इमारती प्रभाग ड मध्ये असून पनवेल शहरामध्ये २० धोकादायक इमारती आहेत. या प्रभागात पालिकेच्या धोकादायक इमारतींसाठी स्थापन केलेल्या समितीने ८० इमारतींना धोकादायक घोषित केले होते. यातील ६० इमारती पाडण्यात आल्या आहेत.

# बारावीच्या परीक्षेत कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजचा १०० टक्के निकाल

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये सायन्स विभागामध्ये श्रेयश गजानन नाळे याने ८५.६६ टक्के, तर कॉमर्स विभागात ८४.५० टक्के गुण प्राप्त करून देवदिप दिनेश त्रिपाठी याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम आणि ज्युनिअर कॉलेजच्या सायन्स विभागातून बारावीच्या परिक्षेसाठी एकूण ७८ विद्यार्थी बसले असून सर्व विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. या निकालात सायन्स विभागातून ८५.६६ टक्के गुण प्राप्त करुन श्रेयश गजानन नाळे याने प्रथम, सुप्रिया केदार चौधरी हीने ७९.०० टक्के मिळवत द्वितीय, तर चैतन्य संजय शेडगे याने ७४.८३ टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. कॉमर्स विभागात देवदिप दिनेश त्रिपाठी याने ८४.५० टक्के गुण मिळवत प्रथम, ८३.५० टक्के मिळवत ओम संजय चौधरी द्वितीय तर ८१.१६ टक्के गुण मिळवत अर्चिता विकास कांबळे तृतीय आली आहे.

उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळा कमिटी चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डिलेव्हरी बॉयने लांबवला हॉटेलमालकाचा आयफोन

## खारघरमध्ये घटना उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे एका हॉटेलमध्ये स्विगीची ऑर्डर घेण्यासाठी एक अनोळखी व्यक्ती आली. त्याची ऑर्डर आणण्यासाठी हॉटेल चालक स्वयंपाकगृहात गेला. हीच संधी साधून त्या रायडरने हॉटेल चालकाचा एक लाख १० हजार रुपये किमतीचा आयफोन खिशात टाकून ऑर्डर न घेता पसार झाला. हॉटेल चालक आल्यावर ही बाब लक्षात आली याबाबत खारघर पोलीस ठाण्यात त्या डिलेव्हरी बॉयविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर ७ येथे प्रणव झेमसे यांचे गब्लार्स रुल्स अँड बाउल्स नावाचे हॉटेल आहे. या हॉटेलद्वारे स्वीगी सेवाही दिली जाते. घटनेच्या दिवशी स्विगी ऑर्डर घेऊन जाणारा डिलेव्हरी बॉय आला. त्याने झेमसे यांना ऑर्डर क्रमांक सांगून पदार्थ तयार आहे का अशी विचारणा केली. त्यावेळी झेमसे एकटेच काउंटरवर होते. त्यामुळे ते स्वतः भटारखान्यात जाऊन ऑर्डर झाली का हे पाहण्यास गेले, मात्र बाहेर येऊन पाहिले असता तो रायडर निघून गेला होता. या वेळी काउंटरवर ठेवलेला एक लाख दहा हजार रुपयांचा आयफोन १४ प्रो आढळून आला नाही.

यामुळे झेमसे यांनी सीसीटीव्ही चित्रण तपासले असता त्याच डिलेव्हरी बॉयने काउंटरवर ठेवलेला मोबाइल खिशात टाकून पोबारा केल्याचे आढळून आले. हॉटेल बाहेरचे सीसीटीव्ही चित्रण पाहिले असता तो चोरटा एका स्कुटीवर बसून निघून गेल्याचेही आढळून आले.

# पनवेल परिसरात अनोळखी मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे असून तो रंगाने सावळा, उंची पाच फुट पाच इंच, डोक्याचे केस काळे साधारण वाढलेले, अंगाने सडपातळ असा वर्णन आहे. त्याच्या उजव्या हातावर मराठी भाषेत संगीता असे गांदलेले, तरी या वर्णनाच्या अनोळखी व्यक्तीबाबत कोणाला अधिक काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक एस. डब्ल्यू. वायकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बारावी परीक्षेमध्ये गव्हाण विद्यालयाचे सुयश

## वाणिज्य शाखेचा १०० टक्के, तर कला शाखेचा ९३.०४ टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी २०२३ मध्ये घेतलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजचा एचएससी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४.७३ टक्के इतका लागला



कला शाखेची रिया कांतीलाल नाईक हिने ८४.८३ टक्के गुण मिळवून कला शाखेसह विद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त केला तर वाणिज्य विभागाचा वेद सुरेश पाटील याने ८३.५० टक्के गुण प्राप्त करून वाणिज्य शाखेत प्रथम तर विद्यालयामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. वर्षाली तानाजी काशिद हिने ८०.३३ टक्के गुण संपादन करीत वाणिज्य शाखेत द्वितीय आणि विद्यालयात तृतीय क्रमांक प्राप्त केला.

फेब्रुवारी २०२३ मध्ये झालेल्या इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षे मध्ये श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधून एकूण १५२ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ठ झाले (कला शाखा : ११५ तर वाणिज्य शाखा : ३७) त्यापैकी कला शाखेचे १०७ तर वाणिज्य शाखेचे सर्व ३७ असे एकूण १४४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाने ९४.७६ टक्के निकालापर्यंत मजल मारली.

सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उप मुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते तसेच रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनियर कॉलेज विभागाचे प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदींनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### शाखानिहाय प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी

**कला शाखा**

**प्रथम** – रिया कांतीलाल नाईक (८४.८३ टक्के)
**द्वितीय** – अंतरा जितेंद्र कोळी (७८.५० टक्के)
**तृतीय** – रिंकी हरिभाऊ जोंधळे (७०.८३ टक्के)

**वाणिज्य शाखा**

**प्रथम** – वेद सुरेश पाटील (८३.५० टक्के)
**द्वितीय** – वर्षाली तानाजी काशिद (८०.३३ टक्के)
**तृतीय** – ललिता बसंतकुमार पुरोहित (७६.०० टक्के)

# पनवेलमध्ये उद्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंड ते अंदमान'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नववर्ष स्वागत समिती पनवेल यंदा २५वे स्थापना वर्ष साजरा करीत आहे. त्या अनुषंगाने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच २७ मे रोजी पनवेलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या

### अभ्यासक पार्थ बावस्कर यांचे व्याख्यान

जीवन संघर्षावर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

शहरातील श्री. विरूपाक्ष मंगल कार्यालयात शनिवारी (दि. २७) सायंकाळी ६ वाजता स्वा. सावरकरांच्या जीवनचरित्राचे अभ्यासक पार्थ बावस्कर यांचे 'स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंड ते अंदमान' या विषयावर व्याख्यान होणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नववर्ष स्वागत समितीचे अध्यक्ष अमित ओझे, श्री विरूपाक्ष महादेव मंदिर न्यास, केशवस्मृती नागरी सहकारी पतपेढी यांनी केले आहे.

# श्रुती कोकाटेची युपीएससी परीक्षेत कौतुकास्पद कामगिरी

**पनवेल : वार्ताहर**

खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष दत्तात्रय कोकाटे यांची कन्या श्रुती सुभाष कोकाटे हिने अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी) परीक्षेत यश संपादन केले आहे. तिने संपूर्ण भारतातून ६०८ क्रमांक पटकावले आहे. याबद्दल नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारबे यांनी तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा २०२२ चा अंतिम निकाल मंगळवारी जाहीर झाला. भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, केंद्रीय सेवा गट अ, गट ब अशा पदांसाठी नागरी सेवा परीक्षा २०२२ घेण्यात आली होती. यूपीएससीने जाहीर केलेल्या निकालामध्ये नुकतेच खांदेश्वर पोलीस ठाण्यामधून खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून पदोन्नती झालेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांची कन्या श्रुती सुभाष कोकाटे हिने सुयश प्राप्त केले आहे. आपल्या वडिलांप्रमाणे देशासाठी सेवा करण्याची इच्छा बाळगणारी श्रुती हिने संपूर्ण भारतातून ६०८ वा क्रमांक प्राप्त केला आहे.

तिच्या या यशामुळे संपूर्ण नवी मुंबई पोलीस दलात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.




# कळंबोलीत उद्या मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांच्या प्रयत्नाने व्हिजन फाउंडेशन ऑफ इंडिया व राजू रोडवेज ट्रान्सपोर्ट यांच्या वतीने शनिवारी (दि. २७) मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

कळंबोली हांसधोनी सिडको सेक्टर १५ येथे होणारे हे शिबिर गरीब गरजूंना दिलासा मिळावा या एकाच उद्देशाने आयोजित करण्यात आले आहे. या वेळी मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया करण्यात येऊन चष्मे वाटप करण्यात येणार आहेत. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन राजेंद्र शर्मा यांनी केले आहे.

# डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह मजकूर व्हायरल करणाऱ्याविरोधात गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविरुद्ध सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर व्हायरल करणाऱ्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ट्विटर या सोशल मीडियावर 'पापा पापी Ashu८७९८७' आणि 'जगो कफिरो' या अकाउंट धारकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविरुद्ध सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर व्हायरल केल्याची पोस्ट फिर्यादी अ‍ॅड. अमित कटारनवरे यांच्या निदर्शनास आली. संबंधित पोस्टचा स्क्रिनशॉट काढून त्यांनी या ट्विटरधारकांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याविषयी अधिक तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

दरम्यान, समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अफवांवर विश्वासन ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# लाईफ लाईन नर्सिंग स्कूलमध्ये परिचारिका दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. आबासाहेब उत्तमराव बेडेकर चॅरिटेबल ट्रस्टच्या पनवेल येथील लाईफ लाईन नर्सिंग स्कूलमध्ये परिचारिका दिन आणि एएनएमच्या सोळाव्या बॅचचे, तर जीएनएमच्या पहिल्या बॅचचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे झाले.





या वेळी परिचारिका दिनामित्त शपथ देऊन सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या सोहळयाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रफुल्ल पाटील यांनी उपस्थित राहून परिचारिका दिनाचे महत्त्व सांगितले.

या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, व्यवस्थापकीय संचालक अध्यक्ष प्रकाश पाटील, व्यवस्थापकीय अध्यक्ष जयश्री पाटील, अभिजित म्हस्के, केतकी पाटील-म्हस्के, अजिंक्य पाटील, जान्हवी पाटील, पराग बेडसे आदी उपस्थित होते.

# पावसाळी हंगामासाठी मोरा-भाऊचा धक्का सागरी वाहतुकीचे तिकिट दर वाढणार

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

मोरा-भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात शुक्रवार (दि. २६)पासून २५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. पावसाळी हंगामासाठी दरवाढ केल्याने सागरी प्रवास दरवर्षी प्रमाणे महागणार आहे.

दरवर्षी पावसाळी हंगामात मोरा-भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात वाढ केली जाते. यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात ८० रुपयांवरुन १०५ रुपयांपर्यंत वाढ केली आहे.हाफ तिकिट दरातही ३९ रुपयांवरुन ५३ रुपयांपर्यंत म्हणजे ९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही दरवाढ २६ मेपासूनच ३१ ऑगस्टपर्यंत लागु राहणार असल्याची माहिती मोरा बंदर निरिक्षक प्रकाश कांदळकर यांनी दिली.



प्रत्येक पावसाळी हंगामात २० ते २५ रुपयांपर्यंत वाढ केली जाते. त्यानंतर वाढ करण्यात आलेली तिकीट दरवाढ उन्हाळी हंगामातही कायम ठेवली जाते. त्यानंतर पावसाळी हंगामात पुन्हा तिकिट दरवाढ केली जाते.

# बारावीच्या परीक्षेत 'युईएस'चे सुयश

**उरण : वार्ताहर**

बारावीच्या निकालात युईएस ज्युनिअर कॉलेजने सायन्स विभागात ९८.०५ टक्के, तर कॉमर्स विभागात ९९.४३ टक्के प्राप्त करून घवघवीत यश मिळवले.

सायन्स विभागात कुलदीप घरत याने ८८.५० टक्के मिळवून पहिला क्रमांक, वरून जैन याने ८८.०० टक्के मिळवून दुसरा क्रमांक मिळविला. तर ओम पाटील याने ८६.८३ टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. तसेच सानिल म्हात्रे याने ८४.०० टक्के मिळवून चौथा क्रमांक मिळविला तर तनुश्री धुमाळ हिने ८३.१७ टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळविला. कॉमर्स विभागात संस्कार घरत याने ९६.१७ टक्के मिळवून पहिला क्रमांक, पल्लवी जाधव हिने ९५.१७ टक्के मिळवून दुसरा क्रमांक मिळविला. तर वंश कपाडिया याने ९५.०० टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. तसेच संस्कृती ठाकूर हिने ९४.३३ टक्के मिळवून चौथा क्रमांक व भूमिका शिरधनकर हिने ९३.३३ टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे अनेकांकडून कौतुक केले जात आहे.

# समर्पण बाल विकास शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री शिवकृपानंद स्वामी फाउंडेशन समर्पण ध्यान परिवार युवा साधकांतर्फे २२ ते २५ मेपर्यंत राधाकृष्ण मंदिर जय भारत नाका येथे सायंकाळी ४. ३० ते ६ वाजेपर्यंत वय वर्षे ५ ते १२ वयोगटातील मुलासाठी बाल विकास शिबिर निःशुल्क आयोजित करण्यात आले होते.



लहान वयात असताना मुलांना जर ध्यान शिकविले तर मोठेपणी जीवन सुसह्य जगण्याचा मार्ग सापडतो. या उद्दात्त हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ओमकार मंत्र, मारुती स्तोत्र, योगा, चित्रकला, गरबा, नृत्य, माईंड गेम, श्लोक, इतर अनेक खेळ घेण्यात आले. पंचतत्व माहिती, देण्यात आली. ध्यानाचे महत्व विषद करून ते त्यांच्याकडून करुन घेण्यात आले. छोट्यानी याचा आनंद लुटला.

सुमारे ३५ते ४०बालकांनी या शिबिरात भाग घेतला होता. समारोपाच्या दिवशी या मुलांचे पालकही सहभागी झाले होते. ज्येष्ठ पत्रकार दिलीप रेडकर यानी या शिबिराला भेट देऊन छोट्या मुलांचे कौतुक केले. अशी शिबिरे प्रत्येक वेळी घेण्यात यावीत, अशी सूचनाही पालकांनी केली.

ह्या शिबिराचे आयोजन समर्पण ध्यान परिवारातील तरुण आणि वृद्ध साधकांनी एकत्रितपणे येऊन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी समर्पण ध्यान युवा वर्गाने मेहनत घेतली. समर्पण ध्यानाने व अल्पोपहाराने या शिबिराची सांगता झाली.

## संपादकीय

# लोकशाहीचे मंदिर

संसदभवनाच्या नव्या वास्तुचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते २८ मे रोजी वीर सावरकर यांच्या जयंती दिनी होत आहे. मोदी आणि वीर सावरकर या दोन्ही नावांच्या अंतर्भावामुळे काँग्रेसीजनांच्या अंगावर शहारा येणे साहजिकच होते. संसदभवनाच्या नव्या वास्तुचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्तेच व्हायला हवे असे खुस्पट काढत काँग्रेससह वीस विरोधीपक्षांनी उद्घाटन समारंभावर बहिष्कार टाकला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेच्या सदस्यत्वाची पहिली शपथ घेतली त्याला नऊ वर्षे पूर्ण होत आहेत. या नऊ वर्षांत आधुनिक भारताचा पाया रचला गेला. कित्येक दशके भारतीयांनी पाहिलेली मोठमोठी स्वप्ने साकार झाली. या नऊ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत काय-काय स्थित्यंतरे घडली, त्याची यथायोग्य नोंद इतिहास घेईलच, परंतु वर्तमान स्थितीत प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावली असेल अशा अनेक घटना गेल्या नऊ वर्षांत घडल्या हे कोणासही मान्य करावे लागेल. अयोध्येतील श्रीरामप्रभूंच्या मंदिराचा विवाद अखेरीस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीतच सुटावा हा काही योगायोग नव्हे. गेली अनेक दशके भिजत पडलेले श्रीराम मंदिराचे प्रकरण मार्गी लागून अयोध्येत मंदिरबांधणी वेगाने सुरू आहे. 'मंदिर वहीं बनाएंगे' हे भारतीय जनता पक्षाने दिलेले वचन पंतप्रधान मोदींनी पूर्ण केले. याशिवाय त्यांनी आणखी एका भव्य मंदिराची निर्मिती पूर्णत्वास नेली. हे मंदिर आहे लोकशाहीचे! दिल्लीतील संसदभवनाच्या समोरच नवे अत्याधुनिक संसद भवन उभारण्याचा विडा पंतप्रधान मोदी यांनी उचलला. वास्तविक सध्याचे संसदभवन अपुरे पडत असून त्याच्या जुन्या बांधकामातील समस्यादेखील त्रासदायक ठरत असल्याची चर्चा वारंवार होत असे. ब्रिटिश राजवटीत १९२७च्या सुमारास आपले संसदभवन उभे राहिले. ती वास्तु निश्चितपणे ऐतिहासिक महत्त्वाची आणि तितकीच देखणी आहे, परंतु आधुनिक भारताच्या आकांक्षा आणि भविष्याचा विचार करता नव्या संसदभवनाची गरज होतीच. ती ओळखून पंतप्रधान मोदी यांनी अवघ्या पाच वर्षांच्या आत संसदभवनाची नवी वास्तु आपल्या देखरेखीखाली उभी केली. संसदभवन हे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे. त्याचा वापर राजकीय हेव्यादाव्यांसाठी करू नये एवढेदेखील भान विरोधकांना राहिले नाही. उद्घाटनाच्या समारंभामध्ये सहभागी होण्याचा उमदेपणा काँग्रेस नेत्यांनी दाखवला असता तर ते उचित झाले असते, परंतु मोदीद्वेषाच्या ज्वराने पछाडलेल्यांकडून उमदेपणाची अपेक्षा करणे व्यर्थच आहे. जुन्या संसदभवनाच्या विस्तारित इमारतीचे उद्घाटन १९७५ साली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्तेच झाले होते आणि नंतर काही वर्षांतच संसदेच्या ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान राजीव गांधी यांनी केले होते. या घटना काँग्रेस नेते सोयीस्कररित्या विसरलेले दिसतात. संसदभवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हावे असा संकेतच अस्तित्वात नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे लोकशाहीचे नवे मंदिर उभे राहिले ही बाब काँग्रेसला तसेच इतर मोदीद्वेष्ट्यांना स्वीकारावीच लागेल. याच काँग्रेसच्या नेत्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे किती अपमान केले होते हे लोकांना चांगलेच आठवते आहे. महामहीम राष्ट्रपतींबद्दल अनुदार उद्गार काढणारे हेच नेते आता त्यांच्या मानपानाचा मुद्दा पुढे करत आहेत. हा एक लोकशाहीतील विदारक विनोदच म्हणायला हवा. नको त्या गोष्टींबद्दल राजकारण करण्यापेक्षा विरोधकांनी जनमताचा आदर करून मोदी सरकारच्या चांगल्या उपक्रमांना दाद द्यावी, अशी खरी जनतेची अपेक्षा आहे.**

# ब्ल्यू अ‍ॅण्ड ग्रीन एमआयडीसी एक उत्तम पर्याय

अलिबाग तालुक्यातील शहापूर येथे ब्ल्यू अँड ग्रीन एमआयडीसी उभारण्याचा प्रत्न येथील शेतकरी करीत होते. काही शेतकऱ्यांनी शासनाची मदत न घेता तलाव खोदून तेथे जिताडा संवर्धन केले. कृषी पर्यटन सुरू केले. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. असे पर्यावरण पूरक प्रकल्प शेतकरी राबवत असतील तर त्यांना शासनाने मदत केली पाहिजे. कोकणात पर्यावरणाची हानी करणारे प्रकल्प आणण्यापेक्षा पर्यावरण पूरक नैसर्गिक साधानांचा उपयोग करून ब्ल्यू अ‍ॅण्ड ग्रीन एमआयडीसी तयार केली तर तो एक चांगला पर्याय ठरू शकेल.



परिसरातील सर्व जिताडा तलावांची ब्लू एमआयडीसी व बांधावर ग्रीन एमआयडीसी अशी ही योजना आहे. बांधावर सोलारमधून वीजनिर्मिती, पर्यटकांना न्याहरी व्यवस्था, मासे पकडणे, बोटिंग, असंख्य तरुणांना रोजगार, महिला बचत गटांना न्याहरीमध्ये सामावून घेऊन त्यांन तलावाच्या बांधावरच रोजगार प्राप्ती, याची सांगड घालून ब्ल्यू अ‍ॅण्ड ग्रीन एमआयडी उभारावी अशी ही योजना आहे. या ठिकाणी नैसर्गिक वातावरणात जिताड्याची चांगली पैदास होते. यातून हजारो रुपये उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत आहे.

या ठिकाणी कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन, मत्स्य शेती, खेकडा शेती, भाजीपाला शेती असे उत्पन्न वाढीचे अनेक प्रकल्प तसेच सौरउर्जा निर्मिती याचा यात समावेश असून यातून शासनाचा उर्जा निर्मितीचा उद्देशही सफळ होईल आणि शेतकऱ्यांनाही नोकरी न करता पुरेसा उत्पन्न मिळेल.

धेरंड व शहापूर एमआयडीसी संपादित क्षेत्राच्या अंतर्गत तलाव क्षेत्राचे सर्वेक्षण करून तसेच तलावांच्या बांधावर सोलर पॅनलद्वारे वीज निर्मिती प्रक्रीया सुरू करावी. विस्तारित एमआयडीसी संपादित क्षेत्राच्या अंतर्गत तलाव क्षेत्राचे सर्वेक्षण करून उद्योगाचा दर्जा देण्यात यावा. एमआयडीसी धेरंड व शहापूर येथील संपादित क्षेत्राचा सोशल इम्पॅक्ट असेसमेंट बनवावी. प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रमातून शेतकऱ्यांना विशेष प्रशिक्षण द्यावे, यासाठी शासनाने पुढाकार घेणे. खारबांधबंदिस्तीचे मजबूतीकरण करणे, खांडी वारंवार जावू नये यासाठी लालमातीच्या भरावाने बंधारे घालणे, त्यांची रुंदी वाढवणे. तलाव खोदून त्या ठिकाणी जिताडा संवर्धन करावे, अशी मागणी आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात औद्योगिकरणाचे वारे वाहत आहेत. जिल्ह्यात पाताळगंगा, रोहा, महाड, विळे भागाड, उसर यासारख्या औद्योगिक वसाहती आहेत. खालापूर, वडखळ, अलिबाग येथे एमआयडीसीचे नवे प्रकल्प प्रस्तावित आहेत. तर दिघी पोर्ट, दिल्ली मुंबई कॉरीडोर, बल्क ड्रग फार्मा पार्क सारखे प्रकल्प जिल्ह्यात येऊ घातले आहेत. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पही जिल्ह्यात विकसीत केले जात आहे. या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भुसंपादन केले जात आहे. औद्योगिकरण झाल्यामुळे नागरीकरणदेखील वेगाने होऊ लागले आहे. भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणारा रायगड जिल्हा आता औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातोय. वाढते औद्योगिकरण नागरीकरण, खारेपाणी जमीन नापिक होणे, नैसर्गिक आपत्ती यामुळे रायगड जिल्ह्यातील शेती क्षेत्रात मोठी घट झाली आहे. खारभुमी विभागाने खारबंदीस्तीची योग्यवेळी देखभाल न केल्यामुळे समुद्राला आलेल्या उधाणाचे खारे पाणी भातशेतीत शिरून रायगड जिल्ह्यात मागील काही वर्षांत जिल्ह्यातील तीन हजार १६ हेक्टर शेती कायमची नापिक झाली आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. कोकणातील इतर जिल्ह्यांमध्येदेखील अशीच परिस्थिती आहे.

नापीक होत असलेल्या शेतजमिनीवर मत्स्य उत्पादन आणि कृषी पर्यटन अशी ब्ल्यू अ‍ॅण्ड ग्रीन एमआयडीसी उभारल्यास पडीक आणि नापीक जमिनीतून उत्पन्न मिळू शकेल. अलिबाग तालुक्यात तसा प्रयत्न काही शेतकऱ्यांनी केला आहे. सध्या या परिसारात २१० तलाव आहे. शासनाची मदत न घेता शेतकऱ्यांनी ही बांधली आहेत. यातून त्यांना चांगले उत्पन्नदेखील मिळत आहे, परंतु या ठिकाणी जाण्यासाठी चांगले रस्ते नसल्यामुळे पर्यटक तेथे पोहचू शकत नाहीत. शासनाने येथे चांगले रस्ते बांधून दिल्यास येथे पर्यटक पोहचू शकतील.

सिंधुदुर्ग, कणकवली व कोल्हापूर येथील शेतकऱ्यांनी नुकतीच अलिबाग तालुक्यातील शहापूर येथे भेट दिली. या शेतकऱ्यांनी शहापूर येथील ब्ल्यू अ‍ॅन्ड ग्रीन एमआयडीसी प्रकल्पाची माहिती करून घेतली. हा प्रकल्प कोकणात इतर जिल्ह्यातदेखील राबवता येईल. त्यामुळे पाडिक असलेली किंवा नापिक झालेल्या शेत जमिनीतून उत्पन्न मिळू शकेल. पर्यावरण संतुलन राखला येईल. रासायनिक प्रदूषणकारी प्रकल्पांना हा एक चांगला पर्याय ठरू शकेल.





## बदलते तंत्रज्ञान

# खुशखबर! बीएसएनएलही सुरू करणार ५जी सेवा

देशात ५जी सेवा सुरू होऊन काही महिने झाले. जिओ, एअरटेल या कंपन्यांनी ही सेवा देशभरात सुरू केली आहे. आता बीएसएनलही ५जी सेवा सुरु करणार आहे.




या संदर्भात आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. आतापर्यंत बीएसएनएलने ४जी सुरु केले नव्हते, पण आता कंपनी ४जी आणि ५जी सेवा सुरु करणार आहे. केंद्रीय आयटी आणि कम्युनिकेशन मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी ही माहिती दिली.

अश्विनी वैष्णव म्हणाले,'बीएसएनएलने २०० साइट्सवर ४जी नेटवर्क सुरू केले आहे. ४जी नेटवर्क फक्त २०० साइट्सवर सुरू करण्यात आले आहे, पण केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे की, तीन महिन्यांसाठी चाचणी केली जाईल, जर सर्व काही ठीक झाले तर दररोज सरासरी २०० साइट सुरू केल्या जातील.

**५जीबाबत काय अपडेट?**

बीएसएनएलने ४जी आणण्यास सुरुवात केली आहे, पण तरीही ते एअरटेल आणि जिओच्या मागे आहे. कंपनीने ५जी वरदेखील लक्ष केंद्रित केले पाहिजे. सरकारने ५जीबाबत अपडेट देखील दिले आहे. नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत ४जी सुरू होईल, नंतर, ४जी नेटवर्क ५जीवर अपग्रेड केले जाईल. असंही अश्विनी वैष्णव म्हणाले.

वैष्णव म्हणाले, बीएसएनएल ज्या वेगाने सुरू करेल, तीन महिन्यांच्या चाचणीनंतर, आम्ही दररोज २०० साइटवर काम करणार आहोत. ही सरासरी आहे की आम्ही पुढे जात आहोत. याप्रमाणे काम करू, पण नंतर लवकरच नोव्हेंबर-डिसेंबरच्या आसपास, अगदी लहान सॉफ्टवेअर ॲडजस्टमेंटसह, ते ५जी होईल.

आज व्यावहारिकदृष्ट्या प्रत्येक मिनिटाला एक ५जीसाइट सक्रिय केली जात आहे. यामुळे जग आश्चर्यचकित झाले आहे. चारधाम येथे २,००,००० वी साइट स्थापन करण्यात आली आहे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १ ऑक्टोबर रोजी ५जी सेवा सुरू केली. पहिल्या एक लाख ५जी साइट्स सेवा सुरू झाल्यापासून पाच महिन्यांत सुरू झाल्या. जिओ आणि एअरटेलचा संबंध आहे. दोन्ही कंपन्या बीएसएनएलच्या खूप पुढे आहेत. दोन्ही कंपन्यांनी ५जीसह देशातील जवळजवळ प्रत्येक भाग कव्हर केला आहे.

# न्हावा-शेवा बंदराची भरीव प्रगती

**निमित्त**

जवाहरलाल नेहरू बंदर न्यास हा प्रकल्प भारतीय बंदरांच्या मालपेट्यांच्या विकासातील एक मोठा टप्पा मानला जातो आहे. हे न्यास नवी मुंबईच्या न्हावा-शेवा क्षेत्रामध्ये स्थापन झाले. २६ मे १९८९ या दिवशी न्हावा-शेवा बंदर सुरु झाले. आज स्थापना दिनानिमित्त या बंदराच्या विकासकामांचा आढावा घेणारा हा लेख...



जवाहरलाल नेहरू बंदर (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) किंवा न्हावा शेवा आणि आताचे जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी (जेएनपीए) हे आधुनिक सुविधा असलेले बंदर मुंबईच्या उत्तरेला ठाण्याच्या खाडीवर भारतातील सगळ्यात मोठे कंटेनर-बंदर आहे. हे न्हावा आणि शेवा या बेटांवर सन १९८९मध्ये बांधून पूर्ण झाले. मुंबई बंदराद्वारे होणारी मालवाहतूक कमी करण्यासाठी हे बांधण्यात आले. २०१४-१५ साली न्हावा शेवा बंदरातून ४४ लाख ७० हजार कंटेनर्सची ने-आण झाली.

न्हावा शेवा हे बंदर जगातील प्रमुख ३५ कंटेनर बंदरापैकी एक आहे. हा पोर्ट नॅशनल हायवे ३४८ द्वारे रस्ते मार्गे तर पनवेल - न्हावा शेवा रेल्वे लाईन ने जोडला आहे. हा भारतातील कंटेनर हाताळणीत दुसऱ्या क्रमांकावर आहे हे बंदर उरण तालुक्यातील न्हावा शेवा या गावामध्ये वसवलेला आहे जे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात व नवी मुंबईत येते. अनेक कंपन्यांचे वीअर हाऊस आहेत व जेएनपीटी टाऊनशिप येथे आहेत

जेएनपीटी बंदराची देशातील आयात-निर्यात व्यापारवृद्धी प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका राहिली आहे. जेएनपीटीमध्ये एकूण पाच कंटेनर टर्मिनल्स आहेत व हे देशातील पहिल्या क्रमांकाचे कंटेनर बंदर म्हणून नावारूपाला येत आहे. जागतिक पातळीवर कंटेनर बंदरांमध्ये जेएनपीटीचा २८वा क्रमांक आहे.

सध्या जेएनपीटी येथे अनेक प्रकल्प सुरू आहेत. कोरोना संकट असतानाही जेएनपीटीच्या कंटेनर उलाढालीमध्ये ऑक्टोबरपर्यंत ११ टक्के वाढ दिसून आली आहे. सर्वाधिक वाढ मुख्य बंदरापेक्षा न्हावा-शेवा बंदराकरिता झाली आहे. जेएनपीटी बंदराच्या जवळील 'सेझ' व्यतिरिक्त महाराष्ट्रातील जालना, वर्धा, नाशिक व सांगली येथे ड्राय पोर्ट्सचा विकास केला जात आहे. जेएनपीटीतर्फे होणार्या एकूण कार्गो वाहतुकीपैकी ४० टक्के वाहतूक ही महाराष्ट्रातील कंटेनरची असते. लवकरच महाराष्ट्राचा आंतरिक भाग जेएनपीटी बंदराला जोडला जाणार आहे.

जेएनपीटी कंटेनर पोर्टच्या शेजारी २७७ हेक्टर्समध्ये बहुउद्देशीय उत्पादन विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) स्थापन केले जात आहे. या पहिल्या बहुउद्देशीय 'सेझ'चे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१४ मध्ये उद्घाटन केले. हे 'सेझ' मालाची मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय आयात-निर्यात करण्यासाठी स्थापले गेले आहे.

जेएनपीटी परिसरात उभारण्यात येणाऱ्या 'सेझ'मध्ये सव्वा लाख रोजगार निर्माण होणार असून, त्याचा लाभ कोकणातील तरुणांना होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते विकास आणि नौकानयनमंत्री नितीन गडकरी यांनी केले होते. उरणच्या करंजा बंदराच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. गडकरी म्हणाले की, प्रवासी जलवाहतुकीला प्राधान्य दिले जाईल. इंधनाचे दर कमी होण्याकरिता त्यात इथेनॉल वापरले जाईल. त्यातून प्रवास स्वस्त व वेगाने होऊ शकतो.

तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस याविषयी बोलताना म्हणाले होते की, बहुतेक देशांचा विकास सागरी व सामरिक शक्तींवर आधारित आहे. केंद्र सरकार 'सागरमाला' आणि 'नीलक्रांती'च्या माध्यमातून सागरी अर्थव्यवस्था बळकट करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे करंजा मत्स्यव्यवसाय बंदराचे काम हाती घेण्यात येणार आहे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




**नवी मुंबई : महापालिकेमार्फत केंद्र सरकारच्या माझे जीवन, माझे स्वच्छ शहर अभियानांतर्गत '२१ दिवस चॅलेंज'मध्ये ९२ थ्री आर सेंटर्सचे पुनर्नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये गरजू बालकांना खेळणी मिळाल्यावर त्यांच्या निरागस चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहू लागला...**

## आरोग्य प्रहर

# दृष्टी सुधारण्यासाठी उन्हाळ्यात 'हे' पदार्थ खा!



आजच्या काळात लहान वयातच लोकांची दृष्टी कमकुवत होते. कारण आजच्या काळात लोक आपला बराचसा वेळ लॅपटॉप आणि मोबाईलवर घालवतात. दृष्टी वाढवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहाराकडे लक्ष द्यायला हवं. त्याचबरोबर उन्हाळ्याचा हंगाम सुरू आहे, त्यामुळे उन्हाळ्यातील काही पदार्थांचा आहारात समावेश अवश्य करावा. उन्हाळ्यात कोणत्या गोष्टींचे सेवन तुम्ही दृष्टी वाढविण्यासाठी करायला हवे वाचा आणि त्यानुसार कृती करा.

**आहारात आंबट पदार्थांचा समावेश करा**

व्हिटॅमिन सी आंबट पदार्थांमध्ये आढळते. व्हिटॅमिन सी संपूर्ण आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. आहारात आंबट गोष्टींचा समावेश केल्यास ते त्वचेसाठी फायदेशीर ठरते. त्यामुळे दृष्टी वाढवण्यासाठी आहारात फळे आणि भाज्यांचे सेवन केले पाहिजे. यासाठी संत्री, द्राक्षे, पपई आणि टोमॅटो चे सेवन करावे.

**टरबूज खा**

उन्हाळ्यात टरबूजचे सेवन अवश्य करावे. कारण यात ९० टक्के पाणी असते जे आपल्या शरीरासाठी आणि डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. त्याचबरोबर टरबूजमध्ये व्हिटॅमिन ए देखील असते जे डोळ्यांसाठी खूप चांगले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात कलिंगडाचे सेवन केल्याने दृष्टी चांगली होते, वाढते.

**पालेभाज्या**

पालेभाज्या फक्त हिवाळ्यातच नव्हे तर उन्हाळ्यातही खाव्यात. पालेभाज्या खाल्ल्याने दृष्टी तेज होते आणि अनेक आजारांपासून मुक्ती मिळते. त्याचबरोबर पालेभाज्या खाल्ल्याने मोतीबिंदू वगैरे पासून बचाव होण्यास मदत होते. त्याचबरोबर दृष्टी वाढण्यासही मदत होते.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# भाजपला साथ द्या -आमदार प्रवीण दरेकर



## ■ कोंढवी तळ्याचीवाडीत मंदिराचे उद्घाटन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोतवाल-कोंढवी येथील दरेकर भावकी आणि समाजबांधवांच्या ऐक्यातून तालुक्यात पुष्कळ चांगले वातावरण सामाजिक व राजकीयदृष्ट्या दिसून येईल. विकासकामांद्वारे येथील जनतेच्या गैरसोयी दूर करण्यासाठी आपला आमदार निधीदेखील आपण सढळ हस्ते देऊ. कोंढवीतून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांवेळी भाजपला साथ द्या, असे आवाहन विधान परिषदेचे सदस्य आमदार प्रवीण दरेकर यांनी केले.

कोंढवी तळ्याचीवाडी येथे श्रीदेव भैरवनाथ रवळनाथ मंदिर दरेकर व समस्त मंडळी कोंढवी भव्य उद्घाटन सोहळा व कलशारोहण कार्यक्रम उत्साहात झाला. या वेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थितांसोबत संवाद साधला. कार्यक्रमासाठी बिपिन म्हामुणकर, तालुका अध्यक्ष प्रसन्ना पालांडे, महेश निकम, प्रतिक सुर्वे, नितिन बोरकर, समिर सुतार, कार्यक्रम संयोजक साहेबराव दरेकर, महेश मोरे, प्रदीप सुर्वे, भारत मोरे उपस्थित होते.


जिल्हा बँकेसारख्या १२-१३ हजार कोटींची उलाढाल असलेल्या संस्थेतील दुसऱ्या क्रमांकाचा अधिकारी संदीप सुर्वे उपस्थित असताना समाजाला हे नक्कीच अभिमानास्पद आहे. या विभागाच्या विकासासाठी राज्य सरकार तसेच जिल्हा नियोजन मंडळासह आपल्या आमदार निधीतूनही तरतूद करू. सर्वांनाच श्रीदेव भैरवनाथ व रवळनाथांच्या आशीर्वादाने दीर्घ आयुष्य व आरोग्य मिळेल, असा विश्वासही या वेळी आमदार दरेकर यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षातर्फे तळयाचीवाडीतील सभामंडपासाठी १० लक्ष रुपये, कोंढवी तळ्याचीवाडी ते आदिवासीवाडी रस्त्यासाठी १०लक्ष रूपये तसेच प्राथमिक शाळा दुरुस्तीसाठी पाच लक्ष रूपये आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नांनी मंजूर झाले असल्याची माहिती या वेळी तालुकाध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांनी उपस्थितांना दिली.

# मुरूडचा क्रिश जैन बारावी विज्ञान शाखेत तालुक्यामध्ये प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील व्यापारी तपन जैन यांचा मुलगा क्रिश जैन हा अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्याने विज्ञान शाखेत ७८.३३ टक्के गुण मिळवून तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. सध्या त्याने नीट परीक्षा दिली असून वैद्यकीय क्षेत्रात जाणार आहे.



अंजुमन इस्लाम मधील विज्ञान शाखेतील चापेकर अमरीन अमानुल्लाह हिला ७४.१७ टक्के गुण प्राप्त होऊन द्वितीय क्रमांक मिळवला आहे. टाके मुइझ मुशाररिफ याला ७२.३३ टक्के गुण मिळाले आहेत. अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांपैकी ९७ विद्यार्थी पास झाले आहेत. कला शाखेत ६६ विद्यार्थ्यांपैकी ५१ पास झाले आहेत.

या विद्यालतील टाके सानिया अझीम हिला कला शाखेत ६९.८३ टक्के मिळाले आहेत. सना खातून रफिक ६७.८३ टक्के मार्क मिळाले आहेत. तर घलटे नूरीन नौशाद हिला ६३.३३ टक्के गुण मिळाले आहेत

तालुक्याचा कला शाखाचा निकाल ४६.७ टक्के लागला आहे. प्रथम कोमल नथुराम पाटील ६९.५० टक्के, द्वितीय संस्कार पवन पाटील ६३.५० टक्के, तृतीय रोहन तुकाराम हातचांगे ६०.३३ टक्के पटकाविले. वाणिज्य शाखेचा निकाल ९१.९८ टक्के एवढा लागला आहे. प्रथम सेजल प्रवीण खोत ८९.५० टक्के, द्वितीय विश्वम संजय पोतदार ८७ टक्के, तृतीय क्रमांक प्रणव रवींद्र पाटील ८४.८३ टक्के मिळविले. बँकिंग शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे.प्रथम हर्षाली नरेश पाटील ६८.६७ टक्के, द्वितीय ताहीर एजाझ उलटे ६४ टक्के, तृतीय सुरज रोहिदास आग्रावकर ६१.८३ टक्के मिळविले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तालुक्यातून कौतुक होत असून या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# माणगावजवळ भरधाव ट्रकची कॉँक्रीटीकरण मशीनला धडक



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावजवळ असलेल्या हॉटेल अंब्रेलासमोर भरधाव ट्रकची कॉँक्रीटीकरण मशीनला धडक लागून झालेल्या अपघातात मशीनसह ट्रकचे नुकसान झाले. हा अपघात बुधवारी (दि. २४) दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद चेतक इंटरप्राइसेस लिमिटेडचे जनसंपर्क अधिकारी सतीश मनोहर दाशेटवार (वय ४९) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

आरोपी रमेश नामदेव डाखोरे (वय ६४, रा. जाखादेवी रत्नागिरी) यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रक (एमएच ०८ डब्लू ८६४३) भरधाव वेगाने चालवून समोर उभ्या असलेल्या कॉँक्रीटीकरण मशीनला जोरदार धडक दिली. या अपघातात मशीनसह ट्रकचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रावसाहेब कोळेकर हे करीत आहेत.

# विकासाला विरोध नाही, पण आधी मोबदला द्या!

## भूसंपादनाबाबत खोपोली लौजीतील शेतकऱ्यांचा पवित्रा



**खोपोली : प्रतिनिधी**

आमचा विकासाला विरोध नाही, पण मोबदला न देता रस्त्यासाठी भूसंपादन करणार असाल तर आमचा यास तीव्र विरोध असणार, असा पवित्रा लौजी येथील बाधित शेतकऱ्यांनी घेतल्यामुळे प्रशासनाबरोबर गुरुवारी (दि. २५) झालेल्या चर्चेदरम्यान प्रशासनाला अखेर युटर्न घ्यावा लागला.

नगरपालिका हद्दीतील लौजी येथे क्रिएटिव्ह या इमारतीला रस्त्यासाठी जागा देण्याबाबत नगर परिषदेने शेतकऱ्यांना नोटिसा बजावून भूसंपादन करण्यासाठी बुधवारी पोलीस फौजफाटा घेऊन प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी आले. शेतकऱ्यांनी यास त्या वेळी तीव्र विरोध केला. शेतकरी आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे अखेर प्रशासनातील अधिकाऱ्यांना माघार घ्यावी लागली. याच संदर्भात गुरुवारी मुख्य अधिकारी अनुप दुरे यांनी शेतकऱ्यांची बैठक आयोजित केली होती, परंतु शेतकरी आपल्या भूमिकेवर ठाम होते. मुख्याधिकारी यांच्याकडून कुठलेही ठोस आश्वासन न मिळाल्यामुळे बैठकीत नाराजीचा सूर होता.

शेतकऱ्यांनी नगर परिषदेच्या अनेक कामांबद्दल त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. इमारतींना परवानगी देताना त्या इमारतीला रस्ता आहे की, नाही याबाबत प्रशासन खातरजमा करीत नाही, तसेच या इमारतीच्या सांडपाणी गटाराचे नियोजन केले जात नाही, त्यामुळे सर्व सांडपाणी शेतात जाऊन आमच्या शेतीचे नुकसान होत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. चर्चेदरम्यान शेतकरी व मुख्याधिकारी यांच्या काही मुद्यांवर खडाजंगी झाली, अखेर मुख्याधिकारी यांनी पुन्हा त्या जागेचा सर्व्हे करून त्याचा अहवाल तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना पुन्हा चर्चेला आमंत्रित करणार असे सांगितले.

# रेवदंडा थेरोंड्यात तीन कोटींच्या कामांना मंजुरी

## आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्न

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीत आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने तब्बल तीन कोटींची विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास योजनेंतर्गत रेवदंडा किल्ला अंतर्गत रस्ता, लांबाते गल्ली ते सरदार गल्लीपर्यंत रस्ता, रेवदंडा अंतर्गत रस्ता, रेवदंडा हायस्कूल ते समुद्रकिनारा रस्ता, गोळा स्टॉप ते यशवंत पिटनाईक यांचे घरापर्यंत रस्ता, सुतार आळी कॉँक्रिट रस्ता व गटार बांधणे, बहिरी आळी कॉँक्रिट रस्ता व गटार बांधणे, अद्यावत मच्छीमार्केट, थेरोंडा पानसेवाडी ते अळुकरवाडीपर्यंत रस्ता, आप्पा अंबुकर चौक ते ज्ञानेश्वर टिवळेकर यांचे घरापर्यंत रस्ता, थेरोंडा खंडेरावपाडा अंतर्गत रस्ता, आंग्रेनगर रस्ता, रेवदंडा अंतर्गत रस्ता, थेरोंडा आगलेची वाडी येथे सामाजिक सभागृह, मुस्लिम पागार मोहल्ला समाज सभागृह बांधणे, मोठे बंदर भंडारी सामाजिक सभागृह बांधणे अशा कामांना मंजुरी देण्यात आली.

शिवसेना अलिबाग तालुकाध्यक्ष प्रफुल्लशेठ मोरे, रेवदंडा शहराध्यक्ष योगेश पिटनाईक, शहर उपाध्यक्ष विजय हाडकर, सेक्रेटरी समीर आठवले, खजिनदार केदार खोत, सदस्य मन्सुर तांडेल, चंद्रकांत दांडेकर, विवेक दांडेकर, शैलश गोंधळी यांनी आमदार महेंद्र दळवी यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

# चौकच्या यशवंतराव देशमुख महाविद्यालयाचा ७१.८५ टक्के निकाल

**चौक : प्रतिनिधी**

विद्या प्रसारणी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव देशमुख कला आणि वाणिज्य शाखेचा निकाल ७१.८५ टक्के लागला आहे. उत्तीर्ण विद्यार्थी यांचे कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

कला व वाणिज्य शाखा मिळून १३५ विद्यार्थ्यांनी १२वीची परीक्षा दिली होती. त्यातून ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पूजा प्रभु कोळी ८१.८३ टक्के, सुभाष माने ८१.६७ टक्के, रुक्मिणी देवाशी ७९.१७ टक्के, सपना राठोड ७५.५० टक्के, गिरीष सकपाळ ७५.५० टक्के, साक्षी शिगवण ७०.१७ टक्के हे विद्यार्थी प्रथम पाचमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. मुख्याध्यापक भोमले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/5859 B 2016 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ- 0450 चे मालक **किशोर दत्तात्रेय मनोरे** यांचे तारीख २९/०८/२०२० रोजी निधन झालेले आहे.

मी सुनीता दत्तात्रेय मनोरे, पत्ता : रा. शिवकर, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालयात निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सुनीता दत्तात्रेय मनोरे**

**पत्ता- रा. शिवकर, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करणेबाबत.**

१. याद्वारे नोटीस देण्यात येते कि, खाली दर्शविलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या **मौजे-माणघर ता.पनवेल जि. रायगड** येथील जमीन नवी मुंबई प्रकल्पाअंतर्गत संपादन करण्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र मुबई विभाग मुंबई क्र. **LAQ-C-(१) ११९ दिनांक १४/०६/१९७२** मध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच नवी मुंबई विकास प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची नवनगर विकास प्राधिकरण म्हणुन नेमणूक करण्यात आलेली आहे.

२. दिनांक ०१.०१.२०१४ पासून सन -२०१३ च्या न्याय/योग्य नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत (ज्याच्या पुढे नवीन केंद्रीय अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे) त्या कायद्यातील कलम १०८ पोटकलम (१) (२) अन्वये राज्य शासनाच्या कायद्यान्वये किंवा धोरणान्वये संपादीत व्हावयाच्या जमिनीचा देय मोबदला व पुनर्वसनाचे लाभ, नवीन अधिनियमाच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त देय असतील तर संबंधित जमीन धारकाची अथवा धोरणानुसार मोबदला व लाभ स्विकारण्यास संमती असेल तर असा जास्त मोबदला आणि पुनर्वसनाचे लाभ देय असलेल्या कायद्याच्या अथवा धोरणाच्या तरतूदी लागू होतील अशी तरतूद आहे.

३. राज्य शासनाच्या नवीन कायद्याप्रमाणे देय असलेल्या जमिनीच्या संपादनापोटी मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा संबंधित धारकांना एकंदरीत जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवी मुंबई विकास प्रकल्पाकरीता लागू करण्यात आले आहे तसेच सदर भूसंपादन प्रक्रीया महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) अन्वये राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे व उपरोक्त संपादनाखालील जमिनीबाबत शासन धोरणान्वये देय असलेला मोबदला व लाभ यासाठी संबंधीत भूधारकांची संमती असल्यास सदर धोरणानुसार जमीन संपादनापोटी भूधारकांना २२.५% योजनेअंतर्गत विकसीत भूखंड देण्याचे धोरण स्विकारले आहे.

४. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ भूधारकांना एकंदरीत फायदेशीर होत असतील व संबंधित भूधारकांनी सदर लाभ स्विकारल्यास भूधारकांना भूसंपादन अधिनियमाव्दारे वाढीव मोबदल्याबाबत कोणत्याही प्रकारची न्यायालयात अर्ज करण्याची मुभा राहणार नाही.

५. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) नुसार भूसंपादन प्रक्रीया राबवून जाहीर करण्यात येणाऱ्या निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकासह भूधारकांना देय होणाऱ्या २.५ चटई निर्देशांकासहीत १०% विकसीत जमीन व १२.५% भू-वाटप योजनेनुसार पात्र असणाऱ्या भूधारकांना १.५ चटई निर्देशांकासहीत विकसीत जमीन अनुज्ञेय राहील. त्यानुसार बाधीत भूधारकांस भूसंपादनाच्या मोबदल्यात अनुज्ञेय व देय विकसीत जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | विकसित जमिनीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | नुकसानभरपाईच्या रोख रकमेऐवजी विकसित जमीन | १०% |
| २ | १२.५% भू-वाटप योजना नुसार पात्र भूधारकांस | १२.५% |
| | एकूण मिळणारी विकसित जमीन २२.५% | २२.५% |

६. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) मधील तरतुदीनुसार व या अधिनियमाच्या कलम १५२ व ११६ नुसार मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील परिशिष्टात नमूद केलेल्या गावातील सर्व्हे नंबरनिहाय जमिनीबाबत मालक/कुळ व इतर हितसंबंधित यांनी जमीन संपादनापोटी व उपरोक्त शासन निर्णय २ व ३ नुसार देय असणारा २२.५% विकसीत भूखंड मिळण्यास संमती असल्यास संमतीपत्रे किंवा हरकत असल्यास लेखी स्वरूपात ही नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), यांचे कार्यालय, १ ला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापुर - ४००६१४. यांच्या कार्यालयात सादर करावीत

७. परिशिष्ट मध्ये नमूद करण्यात आलेले गावनिहाय सर्व्हे क्रमांकापैकी जे सर्व्हे क्रमांक पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये CRZ, कांदळवन बाधित निदर्शनास येतील तसेच ज्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ सदरी इतर अधिकार रकान्यात प्रचलित कायदयानुसार हस्तांतरणास बंदी अशी नोंद असेल अशा सर्व्हे क्रमांकासंदर्भात प्रकरण निहाय निर्णय घेण्यात येईल.

### परिशिष्ट

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. संगणकिकृत ७/१२ | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र ((हे.आर)) | संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) | सिडको महामंडळाच्या ताब्यातील क्षेत्र | संपादनासाठी प्रस्तावित क्षेत्र (हे.आर) | गाव नमुना नं ७/१२ प्रमाणे कब्जेदाराची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माणघर | पनवेल | १९/२ | ०-८०-०० | ०-८०-०० | ०-००-०० | ०-८०-०० | श्री.काना हरी ठाकूर |
| २ | माणघर | पनवेल | ५४ | ०-२९-३० | ०-२९-३० | ०-००-०० | ०-२९-३० | अरुणा राजीव पाटील<br>राजेंद्र दगडूलाल सुराणा |
| ३ | माणघर | पनवेल | ५६ | ०-२१-७० | ०-२१-७० | ०-००-०० | ०-२१-७० | अरुणा राजीव पाटील<br>राजेंद्र दगडूलाल सुराणा |
| ४ | माणघर | पनवेल | १९/१ | १-४२-३० | १-४२-३० | ०-००-०० | १-४२-३० | संजीव विजयकुमार अगरवाल<br>स्मितेश राजेंद्र सुराणा |
| ५ | माणघर | पनवेल | २० | ०-४१-०० | ०-४१-०० | ०-००-०० | ०-४१-०० | संजीव विजयकुमार अग्रवाल<br>स्मितेश राजेंद्र सुराणा |
| ६ | माणघर | पनवेल | ३०/२ | ०-४५-५० | ०-४५-५० | ०-००-०० | ०-४५-५० | स्मितेश राजेंद्र सुराणा |
| ७ | माणघर | पनवेल | ३५ | ०-१२-६० | ०-१२-६० | ०-००-०० | ०-१२-६० | अरुणा राजीव पाटील |
| ८ | माणघर | पनवेल | ३८ | ०-२९-६० | ०-२९-६० | ०-००-०० | ०-२९-६० | अरुणा राजीव पाटील |

**(सतिशकुमार खडके)**
**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/११२/२०२३-२४



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. २

ई निविदा सूचना क्र. ०८/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक २७/०४/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीताच्या ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर, बदलापूर, रोहा, महाड आणि रांजणगाव या निवडक औद्योगिक क्षेत्रांतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये पाण्यामध्ये सुधारणा करण्यासाठी डिझाईन, रेखाचित्रे, अंदाजपत्रके, निविदा प्रपत्रे तयार करणे करीता सल्लागार निवडण्यासाठी प्रस्ताव मागविणेबाबत. |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक दिनांक ०५/०६/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# अडथळा ठरणाऱ्या वृक्षांबाबत पालिकेचा प्रस्ताव

## नेरूळमध्ये काही झाडे तोडणार, तर काही स्थलांतरित करणार

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका हद्दीत विकासकामात आणि इमारतीच्या बांधकामात अडथळा ठरणारी झाडे तोडण्याचा आणि काही झाडे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव उद्यान विभागाच्या वतीने तयार करण्यात आला आहे. त्यामुळे नेरूळमध्ये विकासकामाच्या नावाखाली ४४ झाडांवर संक्रांत आली आहे.

यातील काही मोठी झाडे स्थलांतरित करणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी त्याच्या जागेचा खुलासा करण्यात आलेला नाही. शिवाय, स्थलांतरित केल्यावर ही झाडे जगतील का, असा प्रश्नही काही जागरूक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नेरूळ सेक्टर १८ येथील गणेश तलावाच्या विकासाचे काम हाती घेण्यात येत आहे, मात्र येथील भिंतीलगतची २० झाडे पडण्याच्या स्थितीत असल्याचे नवी मुंबई महापालिकेचे म्हणणे आहे. या २० झाडांमध्ये सहा उंबराची झाडे, ११ फॉक्सटेल, दोन पाम वृक्ष तर, एक नारळाचे झाड आहे. ही २० झाडे इतरत्र स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित आहे तसेच नेरूळ सेक्टर १२मधील प्लॉट नंबर १६मध्ये इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या कामातही येथील २४ झाडे अडथळा ठरत आहेत. या झाडांमध्ये पेल्ट्रोफोरमची १६, शेवग्याची दोन, सातवीणची पाच आणि मोहाच्या एका झाडाचा समावेश आहे. या २४ झाडांपैकी ११ झाडे तोडण्याचे प्रयोजन आहे तर १३ झाडे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव आहे.

अनेक ठिकाणी झाडे स्थलांतरित करण्याचा पर्याय देण्यात आला आहे, मात्र झाडे स्थलांतरित कुठे करणार असा प्रश्न आहे. विशेष म्हणजे झाडे स्थलांतरित करण्यासाठी लागणारी सक्षम यंत्रणा ही महापालिकेकडे नाही.

शिवाय ही झाडे इतकी मोठी आहेत. कि इतकी मोठी झाडे स्थलांतरित कशी करणार? हा मोठा प्रश्न आहे. इतकी मोठी झालेली झाडे स्थलांतरित केली तर ती जगणार का? त्यामुळे नवी मुंबई मनपाने अगोदर झाडे स्थलांतरित करण्याची यंत्रणा सक्षम करावी अन्यथा विकासाच्या नावाखाली सर्व झाडे जीवानिशी जाणार हे नक्की अशी संतप्त प्रतिक्रिया वृक्षप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.





### तक्रार, हरकत नोंदवण्याचे आवाहन

दोन्ही प्रकल्पांसाठी झाडे तोडणे आणि स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावास परवानगी देण्याची वृक्ष प्राधिकरणाची तयारी आहे, मात्र या झाडांवर पक्ष्यांची घरटी असल्यास किंवा कुणाला याबाबत हरकत नोंदवायची असल्यास त्यांनी महापालिकेच्या उद्यान विभागाकडे याबाबत रीतसर तक्रार किंवा हरकत नोंदवावी, असे आवाहन महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने करण्यात आला आहे.

# रस्त्यावर टाकलेल्या फांद्या उचलण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरात पावसाचे आगमन लवकरच होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई मनपाकडून मान्सूनपूर्व कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. नेरूळ विभागात वृक्षछाटणीची कामे सुरू आहेत मात्र झाडांच्या फांद्या त्वरित उचलण्याची कारवाई धीम्या गतीने होत असल्याने रस्त्यावर फांद्या जैसे थे स्थितीत आठवडाभर असल्याने नागरिक संताप व्यक्त करित आहेत.

नवी मुंबई मनपाच्या माध्यमातून मान्सूनपूर्व कामे सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन नेरूळ विभागात झाडांच्या फांद्या छाटणीची कामे सुरू आहेत, मात्र वृक्षांची छाटणी केलेल्या झाडांच्या फांद्या आठवडाभर नेरूळ सेक्टर १० मधील एकता अपार्टमेंट प्रवेशद्वाराजवळ जैसे थे स्थितीत आहेत. या फांद्या वेळीच उचलल्या जात नसल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत आह. झाडांच्या फांद्या छाटून रस्त्यावर टाकल्या जात असल्याने नागरिकांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

काही फांद्या डेब्रिज असलेल्या जागी टाकल्या जात असल्याने त्या ठिकाणी अस्वच्छता निर्माण होत असल्याने नेरूळ विभाग अधिकाऱ्यांनी वेळीच फांद्या हटवण्याची कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



# रस्त्यांची पाहणी करून खड्डे बुजवा

## भाजप नेते पांडुरंग आमले यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोडमधील प्रभाग ३० मधील बाह्य व अंर्तगत रस्त्यांची पाहणी करून पावसाळा सुरु होण्यापूर्वी खड्डे बुजविण्याची व रस्त्याची डागडूजी करण्याची मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे नवी मुंबईचे जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी केली. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्तांकडे एका निवेदन दिले आहे.

पावसाळा आता अवघ्या आठ दिवसांवर आला आहे. सानपाडा नोडमधील प्रभाग ३० येथील सानपाडा कारशेड, सानपाडा नोडमधील सेक्टर २,७, ८,९, १० (काही भाग), सेक्टर ११, १२, १५, १६, १६ ए, १७, १८, १९, २०, जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसरातील अंर्तगत व बाह्य रस्त्यांबाबत पालिका प्रशासनाने तातडीने पाहणी अभियान राबवावे. प्रभाग ३० मधील अंर्तगत व बाह्य रस्त्यावरील पाहणी अभियानात ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले असतील अथवा रस्ते कोठे दबले गेले असतील तसेच रस्त्यावरील डांबरीकरण उखडले गेले असेल तर संबंधितांना त्या रस्त्यांची डागडूजी करण्याचे तातडीने निर्देश द्यावेत, असे आमले यांनी निवेदनात म्हटले आहे.

समस्येचे गांभीर्य पाहता सानपाडा नोडमधील प्रभाग ३० येथील सानपाडा कारशेड, सानपाडा नोड परिसरातील अंर्तगत व बाह्य रस्त्यांबाबत आपण संबंधितांना निर्देश देवून पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्याची डागडूजी पूर्ण करण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात प्रकल्पाचे सादरीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजसाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा केला. आज सर्व सामान्य रुग्णांना व वैद्यकीय महाविद्यालयचा फायदा होणार आहे व वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणांना व तरुणींना यांना मोठा लाभ मिळणार आहे. याच अनुषंगाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजच्या प्रकल्पाचे सादरीकरण केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, हा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज हे ८.४० एकरामध्ये उभारला जाणार असून अंदाजे ८१९.३० कोटी खर्च अपक्षित आहे. तसेच कँसर, हृदय, मेंदू अशा आजारांवर सेवा दिली जाणार आहे. याची क्षमता ही ५०० बेड हून अधिक असून हॉस्पिटल पूर्णत: सर्व सुविधयुक्त बनणार आहे. इथ पीजी/नर्सिंग शैक्षणिक वसतिगृह, पदव्युत्तर शैक्षणिक संकुल, अभियांत्रिकी यार्ड, रुग्णांनसोबत येणाऱ्या नातेवाईकांना राहण्याकरिता धर्मशाळा, नर्सिंग वसतिगृह, अभ्यागत केंद्र, पदव्युत्तर विद्यार्थी वसतिगृह, वाहनतळ व इतर अनेक सुविधा उपलब्ध होणार असून स्थानिक नागरिकांना रोजगार निर्माण होणार आहे.



या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सदर प्रकल्प हा लवकरात लवकर नवी मुंबईकरांसाठी उभारला जाईल. नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याशी व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत लवकरात लवकर बैठक घेऊन सदर प्रश्न मार्गी लावतो. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत संबंधित कार्यकारी अभियंता, अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे नवी मुंबईकरांमध्ये आनंदाचे वातवरण पसरले आहे व सर्वांकडून आमदार मंदा म्हात्रे यांचे कौतुक होत आहे.

# नवी मुंबईत रविवारी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम; पालिकेतर्फे नियोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात रविवारी (दि. २८) उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ करण्यात येणार असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले आहे.

भारत देश पोलिओमुक्त आहे. परंतू काही देशांमध्ये अद्याप पोलिओ असल्याने तो पुन्हा परत येऊ शकतो यासाठी पल्स पोलिओ मोहीम राबविली जात आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयोगटामधील अपेक्षित ९०८९७ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य नजरेसमोर ठेऊन मोहीमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात ६०४ स्थायी बूथ, ९४ ट्रान्झिट बूथ आणि २८ फिरते (मोबाईल) बूथ असे एकूण ७२६ बुथ कार्यरत असणार आहेत. या लसीकरण मोहिमेसाठी मॉल, रेल्वे स्टेशन, बस स्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी ट्रान्झिट व फिरती मोबाईल पथके तयार करण्यात आलेली आहेत.



याचप्रमाणे मोहीमेच्या सुनियोजित आयोजनाच्या दृष्टीने महापालिका अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांच्या अध्यक्षेतखाली सिटी टास्क फोर्स समितीची बैठक घेण्यात आली असून नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविण्याकरिता वैद्यकीय अधिकारी, एनएम, एलएचव्ही, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे रितसर प्रशिक्षणही घेण्यात आलेले आहे.

पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेच्या दिवशी बाळाच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने बूथवरील स्वयंसेवकांनी बाळाला आपल्या हाताचा स्पर्श होणार नाही याची काळजी घेणे तसेच बाळाच्या डाव्या करंगळीवर पेनने खूण करताना बाळाचा हात स्वत: न पकडता त्याची आई अथवा पालक यांना हात पकडण्यास सांगणे अशा छोट्याछोट्या पण महत्वाच्या गोष्टी प्रशिक्षणात सांगण्यात आलेल्या आहेत.

या मोहीमेची माहिती व्यापक स्वरूपात जनमानसात प्रसारित होण्याकरिता महापालिका कार्यक्षेत्रात जनजागृतीपर पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले असून महानगरपालिकेच्या सोशल माध्यमांवरूनही मोहीमेची प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. या पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत ज्या बालकांना २८ मे २०२३ रोजी काही कारणास्तव डोस दिला गेला नाही तर त्याचेही नियोजन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले असून त्यानंतर घरोघरी जाऊन लसीकरण करण्यासाठी ८८१ टिमद्वारे गृहभेटींमध्ये लसीकरण करण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक टिमचे कार्यक्षेत्रनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे.

**पालकांनी आपल्या बालकाच्या संपूर्ण सुरक्षिततेच्या दृष्टीने २८ मे रोजीच्या देशव्यापी मोहीमेत सहभागी होऊन आपल्या ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकाला पल्स पोलिओ लसीचा डोस द्यावा.**

**–राजेश नार्वेकर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# बेलापूरमध्ये अनधिकृत झोपड्यांवर कारवाई



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरमधील ५८ अनधिकृत झोपड्यांवर बेलापूर विभाग कार्यालयाच्या वतीने कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या आदेशाने अतिक्रमण विरोधी विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली सह्यायक आयुक्त शशिकांत तांडेल यांनी ही कारवाई केली.

बेलापूर सेक्टर २९ मधील पंचशील नगर मध्ये अनधिकृत झोपड्याची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. या प्रकरणी स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रार देखील केली होती, मात्र तत्कालीन उपयुक्तांच्या काळात याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात होते. या झोपड्यांना अनधिकृत लाईट आणि पाणीदेखील उपलब्ध करून देण्यात आले होते. परिणामी यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत होती. दरम्यान, नवीन उपायुक्त यांनी या तक्रारीची नोंद घेत त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर तांडेल यांच्या अतिक्रमण विरोधी पथकाने काल जेसीबीच्या साहाय्याने या झोपड्या जमीनदोस्त केल्या.

या वेळी कोणतीही अनुचित घटना घडून नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यापुढे शहरात चालू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त सोमनाथ पोटरे यांनी दिली. यामुळे अनधिकृत बांधकामधारक आणि गावठाण भागात ५०-५० तत्वावर अनधिकृत बांधकामे करणाऱ्या दलालांचे धाबे दणाणले आहेत.

# खारघरमध्ये दोन लॅपटॉपची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

टेबलावर ठेवलेले ४७ हजार रुपयांचे दोन लॅपटॉप अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

बेलपाडा, सेक्टर तीन, खारघर येथील अमित कुमार सैनी व त्यांचा मित्र आदर्श कुमार हे दोघे वॉकिंगसाठी खारघर हिल येथे गेले. त्यांना रूममध्ये भेटण्यासाठी आलेला मित्र विवेक कुमार हा एकटाच झोपला होता. त्यामुळे त्यांनी रूमचा दरवाजा उघडा ठेवून ते वॉकिंगसाठी गेले. वॉकिंगसाठी जाऊन ते दोघे परत आले. त्यावेळी त्यांना रूममधील ठेवलेले लॅपटॉप दिसून आले नाहीत. त्यांनी लॅपटॉपची पाहणी केली मात्र, ते सापडले नाहीत. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# उलवे येथे सायकल दुरुस्तीच्या दुकानातील बालकामगारांची सुटका

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने उलवे सेक्टर १९ मधील सायकलदुरुस्तीच्या दुकानावर छापा मारून एका बालकामगारांची सुटका केली. या बालकामगाराला कमी वेतनात अति श्रमाचे काम देऊन त्याला राबवून घेणाऱ्या या दुकानाच्या मालकावर गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

उलवे सेक्टर १९ परिसरातील अमर सायकल स्टोर्समध्ये बालकामगाराकडून अतिश्रमाचे काम करून घेण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्याआधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांच्या सूचनेनुसार साहाय्यक पोलिस निरीक्षक नीलम पवार व त्यांच्या पथकाने उलवे सेक्टर १९ मधील अमर सायकल स्टोर्स या दुकानावर छापा मारला. एका यावेळी या दुकानामध्ये अल्पवयीन मुलगा काम करत असल्याचे आढळून आले. त्याचे वय ११ वर्षे चार महिने असल्याची तसेच दुकानमालक त्याला कमी वेतनात राबवून घेत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पोलिसांनी या अल्पवयीन मुलाची सुटका केली. यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अमर सायकल स्टोर्सचा मालक जिलाजित बाबुराम निशाद (वय २९) याच्या विरोधात एनआरआय पोलिस ठाण्यात बालकांची काळजी व संरक्षण, बाल आणि किशोरवयीन कामगार नियमन व निर्मूलन अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले.

# लैंगिक अत्याचारप्रकरणी तरुण अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील जुहूगाव परिसरातील राहणाऱ्या आरोपीने १७ वर्षीय मुलीला बुधवारी (दि. २४) सायंकाळी एका इमारतीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. या घटनेची माहिती पीडित मुलीने आईला दिली होती. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने वाशी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली होती. त्यानुसार वाशी पोलिसांनी आरोपीविरोधात बलात्कारासह पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे, तर पीडित मुलीवर उपचार करण्यात येत आहेत.

# कोपरखैरणेत २२५० वाहनांवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे वाहतूक शाखेकडून नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या मोहिमेअंतर्गत १ ते २५ मे दरम्यान कोपरखैरणे वाहतूक शाखेने वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या २,२५० वाहनांवर कारवाई केली आहे. तसेच पुढील काळात अशाच प्रकारे कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास भिंगारदिवे यांनी दिली आहे.

# उन्हाच्या तीव्रतेमुळे शीतपेयांना मागणी वाढली

**पनवेल : वार्ताहर**

यंदा मार्च महिन्यापासून उंचाकी राहिलेल्या पाऱ्यामुळे नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत. त्यात आता गेल्या काही दिवसांपासून तापमानात पुन्हा एकदा प्रचंड वाढ झाल्याने दुपारच्यावेळी सर्वत्र अघोषित संचारबंदी दिसून येत आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते, त्यामुळे शरीराला ऊर्जा व तृष्णा भागविण्यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस, सरबत आदींसह दुग्धजन्य थंडपेयांची व थंडगार फळांची मागणी वाढली असून शहरातील शीतपेयांच्या दुकानासमोर विशेषकरून उसाच्या चरख्यासमोर नागरिकांची गर्दी होतांना दिसत आहे.



दिवसभर उन्हामुळे होणारी अंगाची काहिली व उकाड्याचे प्रमाण यामुळे उन्हाचे चटके मोठ्या प्रमाणात जाणवत आहेत. यामुळे शरीराला थंडावा मिळावा यासाठी नागरिकांकडून विविध प्रकारच्या फळांची व शीतपेयांची मागणी वाढली आहे. सध्या धार्मिक कार्यक्रम, विवाह सोहळे व इतर कार्यक्रमांसाठी बाहेरगावी जाणाऱ्यांनी उसाच्या रसाला पसंती दिली असल्याचे दिसून येत आहे. तसेच वाढत्या तापमानामुळे विवाह समारंभात ताक भोजनातील अविभाज्य घटक झाला आहे.

उन्हामुळे शरीरातील पाणी कमी होते, त्याचा परिणाम थेट शरीरावर होतो. यासाठी जीवनसत्त्व व मूलद्रव्ये युक्त पदार्थासह नारळ पाणी, आवळा, लिंबू पाणी यांचे सेवन करावे. फ्रीजमधील थंड पाणी घातक असून घशाला विकार होऊ शकतात असे तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले.

## निवडक

### भाजपतर्फे खालापूर पोलिसांचा सन्मान

**खालापूर** : श्रीक्षेत्र महड येथे झालेल्या गोमाता हत्या प्रकरणातील गुन्हेगारांच्या अल्पावधीतच मुसक्या आवळून



कडक कारवाई केल्याबद्दल खालापूरचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे वारकरी संप्रदायाच्या वतीने आभार व्यक्त केले. या प्रसंगी भाजप अध्यात्मिक आघाडी रायगड जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे, तालुका संयोजक ह्भप दिगंबर महाराज सणस, युवा कीर्तनकार ह्भप शिवाजी महाराज महाडीक, ह्भप निलेश घरत, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते.

### निवृत्ती वेतनधारकांसाठी नवीन प्रणाली

**अलिबाग** : रायगड जिल्हा कोषागराकडून निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारकांसाठी सन २०२३-२४पासून नवीन आयकर प्रणाली लागू करण्यात आली आहे. जे निवृत्तीवेतनधारक आयकर कपात पात्र आहेत (ज्यांचे वार्षिक निवृत्तीवेतन सात लाखांपेक्षा जास्त अधिक आहे, असे निवृत्तीवेतनधारक) अशा निवृत्तीवेतनधारकांचे नियमानुसार आयकर कपात त्यांच्या निवृत्तीवेतनातून जून २०२३पासून करण्यात येईल. ज्या निवृत्तीवेतनधारकांना जुनी आयकर प्रणाली स्वीकारायची आहे त्यांनी चालू आर्थिक वर्षासाठी (सन २०२३-२४) केलेल्या गुंतवणुकीच्या तपशीलासह जुनी आयकर प्रणाली स्वीकारण्याबाबतचा लेखी अर्ज जिल्हा कोषागार कार्यालयाकडे त्वरित सादर करावा. अर्ज तपशील सादर न केल्यास, नियमानुसार आयकर कपात निवृत्तीवेतनातून करण्यात येईल. निवृत्तीवेतनधारकांनी ही माहिती तात्काळ कोषागार सादर करून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### कवयित्री अपूर्वा जंगम यांचा सत्कार

**माणगाव** : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या माणगाव शाखेच्या सचिव  अपूर्वा अमोल जंगम यांचा ८० कवितांचा संग्रह नाशिक येथे प्रकाशित झाला. साहित्याच्या समांतर विचाराच्या शिक्षणप्रेमी मंडळांनी या पुस्तकाचे प्रकाशित केले. या प्रित्यर्थ रायगड जिल्हा वीरशैव जंगम समाजातर्फे कवयित्री अपूर्वा जंगम यांचा सत्कार बुधवारी (दि. २४) गोरेगाव येथे कविता जंगम व रागिणी जंगम यांच्या सहकार्याने करण्यात आला. या वेळी राजपुरोहित प्रकाशस्वामी, रणजित स्वामी, लक्ष्मण स्वामी, अस्मिता व अ. वि. जंगम व कुटुंबिय उपस्थित होते.



# रानबाजिरे धरणातील बॅकवॉटरचा उपसा आवश्यक

## पावसाळ्यात पूरजन्य स्थितीची ग्रामस्थांना भीती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड शहरातील पूरस्थिती नियंत्रणामध्ये आणण्यासाठी पोलादपूरनजीकच्या रानबाजिरे धरणाच्या बॅकवॉटरचा तातडीने उपसा करण्याची आवश्यकता आहे. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत असून पावसाळ्यात पूरजन्य स्थिती निर्माण होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.





गेल्या वर्षी २०२२मध्ये पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धरणाच्या बॅकवॉटरचा पूर्णपणे उपसा करून सावित्री नदीच्या पात्राचे पाणी धरणात अधिकाधिक रोखून धरण्याचा प्रयत्न बव्हंशी यशस्वी झाला होता. रानबाजिरे या महाड एमआयडीसीसाठी बांधण्यात आलेल्या धरणाचे स्वरूप चिरेबंदी दगडी बांधकाम आणि सांडव्यांच्या भागास कॉँक्रीटचे अस्तरीकरण, तर स्टेलिंग बेसिसच्या भागात सांडव्यांतून येणारे पाणी साठविण्यासाठी कॉँक्रीटीकरण करण्यात आलेले असे आहे. या धरणाची लांबी ३२० मीटर्स असून सांडवा १२१.८४ मीटर्स आहे. आठ सांडव्यांवरील दरवाजे १२ मीटर्सचे प्रत्येकी आहेत. उच्चालक मोटर क्षमता १० अश्वशक्ती आहे. धरणाची क्षमता ४० मे.टन आहे. पाणीसाठा ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर तर ५५ मीटर पातळीवर १६.४९ दशलक्ष घनमीटर असतो. मृतसाठा ३.६ दशलक्ष घनमीटर असून ६१.५० पातळीवर वापरण्यायोग्य पाणीसाठा २६.३२ दशलक्ष घनमीटर आणि ५५ मीटर पातळीवर पूर्ण संचयपातळी ६१.५० मीटर आहे. सांडव्यांची पातळी ५५ मीटर आहे. भिंतींची पातळी ६४.७० मीटर आहे.

या धरणाचे आपत्कालीन दरवाजे, विद्युत जनित्र आणि उच्चालक क्षमता अशी ठळक वैशिष्ट्येही आहेत. पूरकाळात धरण भरलेले असताना ५८.१० मीटर पाण्याची पातळी असते. सध्या येथील पाण्याची पातळी ५१.५० मीटर एवढी असून ४३ आरएलपर्यंत पाण्याची पातळी खाली करण्याची परवानगी आहे, मात्र गेल्या वर्षी धरणाच्या बॅकवॉटरची पातळी ४३ आरएलपेक्षाही कमी करण्यासाठी सर्व सांडव्यांसह सर्व्हिस गेटमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. गेल्या वर्षी झालेल्या ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठयापैकी २२ मिलीयन क्युसेक पाणीसाठा धरणाचे सहा सांडवे खुले केले असताना अस्तित्वात होता. या सहा सांडव्यासोबतच दोन सर्व्हिस गेटसदेखील उघडण्यात आल्याने साधारणपणे प्रतिसेकंद २५,९४६ घनमीटर पाणीसाठयाचा विसर्ग झाला.

महाड शहर व परिसरातील पूरपरिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीमध्ये रानबाजिरे धरणातील बॅकवॉटरचा पाणीसाठा पूर्णत: रिकामा असल्यास अतिवृष्टीमध्ये बॅकवॉटरची धोक्याची पातळी भरून ओव्हरफ्लो होऊन महाडच्या दिशेने वाहणाऱ्या नदीपात्राचा प्रवाह कमी असेल, असे मत विविध बैठकांवेळी व्यक्त केले होते. या अनुषंगाने मे २०२२पासून बॅकवॉटरचा साठा कमी करण्यास सुरूवात होऊन संपूर्ण बॅकवॉटरचा जलाशय रिकामा करण्यास सुरुवात झाली होती. यंदा बॅकवॉटरचा साठा पूर्णपणे तुडूंब भरलेला असून महाड येथील सावित्री नदीपात्रातील वाळूरूपी गाळउपसा जसा वेगाने होत आहे त्या तुलनेमध्ये रानबाजिरे धरणाच्या बॅकवॉटरचा विसर्ग करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी भर उन्हाळयामध्ये रानबाजिरेपासून पोलादपूर व त्यापुढील गावांमध्ये सावित्री नदीचे पात्र सर्वत्र कोरडे पडले असून नदीलगतच्या कुटूंबियांना पुरेसे पाणी नदीपात्रामध्ये शिल्लक नसल्याचे दिसून येत आहे.

# पोलादपूर तालुक्यात राष्ट्रवादीला धक्का

## कोंढवी गण अध्यक्ष, युवक अध्यक्षांसह ग्रामस्थ शिवसेनेत



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत कोंढवी गणाचे राष्ट्रवादी अध्यक्ष, युवक अध्यक्षांसह मोरगिरी दळवीवाडीतील ग्रामस्थांनी शिवसेनत प्रवेश केला.

या वेळी राजिपचे माजी सदस्य चंद्रकांत कळंबे, पंचायत समिती सदस्य यशवंत कासार, विभाग प्रमुख सतीश शिंदे तसेच सुरेश मोरे, संदीप सकपाळ, विजयबुवा मोरे, सुरेशबुवा शिंदे, जगदीश महाडिक, मनोहर शिंदे, रामचंद्र ढवळे आदी शिवसेनेचे पदाधिकारी या पक्षप्रवेश उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे कोंढवी गणाचे अध्यक्ष बारकू रामजी शिंदे, युवक अध्यक्ष राष्ट्रवादी प्रमोद प्रदीप शिंदे यांच्यासह दत्ताराम शिंदे, दिलीप शिंदे, विजय शिंदे, अक्षय शिंदे, कल्पेश शिंदे आणि हेमा शिंदे, प्रमिला शिंदे, ललिता शिंदे, जनाबाई शिंदे, वंदना शिंदे आदींनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

# माथेरानमध्ये झाड पडून घोड्याचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

पर्यटकांच्या सेवेसाठी घोडानाक्यावर उभा असलेल्या घोड्याच्या अंगावर अचानक झाड कोसळल्यामुळे घोड्याचा जागीच मृत्यू झाला. घोड्यावर झाड पडून मरण पावणारी ही पहिलीच घटना आहे. रिगल हॉटेलच्या समोर ही घटना घडली.


माथेरानमध्ये वाहनांना अजूनही बंदी असताना येथे प्रवासी वाहन म्हणून घोड्याचा वापर होतो. त्यामुळे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी हॉटेलच्या बाहेर घोडे उभे असतात. सबिल महापुळे यांचा हबीबी हा घोडा रिगल हॉटेलसमोर उभा होता. रिगल हॉटेलच्या कंपाउंडमध्ये असलेले सुके झाड सोमवारी (दि. २२) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अचानक कोसळले आणि ते घोड्याच्या डोक्यावर पडले. त्यामुळे घोडा जागच्याजागी मरण पावला. पोलिसांकडून तसेच नगरपालिकेकडून पंचनामा करण्यात आला. पशुवैद्यकीय अधिकारी अमोल कांबळे यांना कळविल्यानंतर त्यांनी शवविच्छेदनासाठी घटनास्थळी आले. सबिल महापुळे यास भरपाई मिळावी, अशी मागणी स्थानिक अश्वपाल संघटनेकडून केली जात आहे.

**माथेरानमधील ३५ टक्के लोकांचा उदरनिर्वाह घोडा व्यवसायावर चालतो. उन्हाळी पर्यटन हंगाम आता कुठे सुरू झाला आहे. कर्ज काढून ५० ते ६० हजार रुपयांचा घोडा आणायचा आणि तो असा मरण पावला तर कर्जाचा बोजा त्या व्यक्तीवर पडतो. त्याला थोडा दिलासा मिळावा यासाठी शासनाकडून त्याला भरपाई मिळावी अशी आमची मागणी आहे.**

**-आशा कदम, अध्यक्ष, स्थानिक अश्वपाल संघटना**

# एसटी जाणार आता फेरीबोटमधून

## आंबेत पूल दुरुस्तीसाठी बंद असल्याने परवानगी



**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड येथील आंबेत पूल अवजड वाहनांसाठी बंद करण्यात आला असल्याने रत्नागिरी जिल्ह्यात जाणाऱ्या एसटीच्या मुंबई, बोरीवली, ठाणे मार्गावरील फेऱ्यावर परिणाम होणार होता, मात्र त्याला पर्याय म्हणून आंबेत-म्हाप्रळ फेरीबोटीतून आता एसटी बसला वाहून नेण्याला परवानगी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने परवनगी दिली आहे. त्यामुळे दोपोली, मंडणगड आगारातील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

एसटी प्रवाशांच्या मागणीप्रमाणे दोपोली, मंडणगड आगारातून धावणाऱ्या बसेसच्या प्रवासी सेवेमध्ये कोणताही खंड न पाडता, त्यांची सेवा आता फेरी बोटीतून केला जाणार आहे. यामध्ये सध्या स्थितीत दापोलीहून मुंबई, शिर्डी, नाशिक, बोरीवली, विठ्ठलवाडी, नालासोपारा धावणाऱ्या काही बसेस आहे, तर मंडणगड येथून शिर्डी बोरीवली, पनवेल, बीड, नालासोपारा धावणाऱ्या सुमारे एकूण २६ फेऱ्या असून, त्या फेरीबोटीतून नियमीत सुरू राहणार असल्याचे एसटीच्या वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक शिवाजी जगताप यांनी सांगितले आहे.

मेरीटाईम बोर्डाने फेरीबोटीत बसला प्रवेश देण्यापूर्वी बसमधील सर्व प्रवाशांना खाली अतरवून घ्यावे, बसमध्ये फक्त प्रवाशांचे सामान ठेवावेत. बसमधून फेरीबोटीमध्ये उतरलेल्या प्रवाशांना लाईफ जॅकेट घालण्याची सर्व जबाबदारी बसवरील चालक,वाहक तसेच बोटमास्टरची राहील. फेरीबोटीमध्ये बस चढ-उतार करतेवेळी प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी चालक, वाहक व परिवहन विभागाची राहिल. फेरीबोटीतील गर्दी नियंत्रण आणि व्यवस्थापनाची जबाबदारी फेरीबोट चालक व ऑपरेटरची राहिल, अशा सूचना केल्या आहेत.

# ग्रामविकास अधिकारी मोहन शेलार सेवानिवृत्त

**चौक : प्रतिनिधी**


ग्रामसेवक ते ग्रामविकास अधिकारी म्हणून आपल्या ग्रामपंचायतीमधील कारभार पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन आणणारे मोहन शेलार यांच्यासारखा अधिकारी असल्याने गावचा विकास होण्यास वेळ लागत नाही, असे गौरवोद्गार सहाय्यक गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी काढले.

मोहन गोपाळ शेलार यांनी आपल्या प्रशासकीय सेवेत ३१ वर्ष सेवा पूर्ण करून निवृत्ती जाहीर केली. त्यामुळे त्यांचा निरोप समारंभ ग्रामसेवक संघटना महाराष्ट्र राज्य १३६ यांनी आयोजित केला होता, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे बोलत होते. मोहन शेलार हे ग्रामपंचायत शिरवली येथे कार्यरत असताना बायोगॅसवर वीज निर्मिती करून गाव वीज वितरण मुक्त करण्याचा प्रयत्न केला. याची दखल राज्य सरकारने घेऊन हा प्रकल्प देशव्यापी कार्यक्रमात गुजरात राज्यात प्रदर्शित केला होता. या कार्यक्रमास पेण पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे, संतोष गुरव, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संतोष पवार, कोकण विभागीय सह सचिव प्रमोद, पाटील, तालुका अध्यक्ष प्रशांत कदम, सचिव अजय फोफेरकर, शेलार कुटुंबीय उपस्थित होते.



# नागोठणे पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

## जयवंत माडपे, मनोज सानप, उमाजी केळुसकर, मंगेश दांडेकर, श्वेता भोईर, ज्ञानेश्वर दळवी यांचा समावेश



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे पत्रकार संघाचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि. २७) ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मंदिराच्या प्रांगणात होत असून, या पार्श्वभूमीवर पत्रकारितेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

या सोहळ्यात जयवंत माडपे खोपोली (कै. रामचंद्र पुरुषोत्तम पत्की ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार), मनोज सानप जिल्हा माहिती अधिकारी (कै. विजय संतुराम देशपांडे उत्कृष्ट सरकारी सेवक पुरस्कार), उमाजी केळुसकर अलिबाग (कै. नवीन नारायण सोष्टे साहित्यिक पुरस्कार), मंगेश दांडेकर (कै. शैलेंद्र विजय देशपांडे आदर्श समाजसेवक/लोकसेवक पुरस्कार), श्वेता भोईर, उरण (कै. राजेश रघुनाथ भिसे होतकरू पत्रकार पुरस्कार) आणि ज्ञानेश्वर दळवी (कै. सनिल उदय भिसे उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार) यांना गौरविण्यात येणार आहे. याशिवाय समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उदय भिसे, सल्लागार राजेश पोवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव महेंद्र माने, उपाध्यक्ष किरण लाड, सहसचिव मनोहर सकपाळ, खजिनदार पुरुषोत्तम घाग, सल्लागार- सुधाकर पत्की, ज्ञानेश्वर दळवी, सदस्य नंदकुमार देशपांडे, नारायण म्हात्रे, प्रज्ञा पोवळे, मिलिंद घाग, संकल्प माने, अर्चित भिसे, संदेश गायकर या सोहळ्याचे नियोजन करीत आहेत.

## शासन आपल्या दारी..!

# शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकासप्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिद्धी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना जाणून घेऊ या लेखातून...

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता बँकेमार्फत मंजूर केलेल्या २० रू. लक्षपर्यंत कर्ज रकमेवरील व्याज परतावा महामंडळाकडून वितरीत केला जाईल.




**योजनेचे स्वरूप** : राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा १० रू. लक्षपर्यंत परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्जमर्यादा २० रू. लक्षपर्यंत.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती** : अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे, अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी भागाकरिता आठ रू. लक्षपर्यंत असावी, अर्जदार हा इ. १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या द्वितीय वर्षे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६० टक्के गुणांसह पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोअर किमान ५००पेक्षा अधिक असावा.

**कर्ज प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे** : अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड, ज्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो, अर्जदाराचा जन्माचा/वयाचा पुरावा, शैक्षणिक शुल्क संबधित पत्र, शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्कमाफी, पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा, आधार संलग्न बँक खाते पुरावा, तसेच इतर आवश्यक कागदपत्रे/पुरावे.

**शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत येणारे अभ्यासक्रम** :

**राज्यांतर्गत येणारे अभ्यासक्रम**-आरोग्य विज्ञान क्षेत्रातील एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बी फार्म व संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम. अभियांत्रिकी क्षेत्रातील बी.ई., बी. टेक, बी. आर्किटेक्चर (सर्व शाखा), तसेच संबधित विषयांतील सर्व पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रम इ.

**व्यावसायिक अभ्यासक्रम**- एलएलबी, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन पदवी, बचलर ऑफ डिझाईन, फिल्म व टेलिव्हिजन अभ्यासक्रम, पायलट, सनदी लेखापाल, एमबीए, एमसीए, शिपिंग विषयांतील पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रम, इ. कृषी **अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान**- ॲनिमल फिशरी सायन्स, बी. टेक, बीव्हीएससी, बी.एससी इ. संबंधित विषयांतील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

**देशांतर्गत अभ्यासक्रम**- केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद,शासकीय अनुदानित व खासगी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी प्रात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले व प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता आहे. यात आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, कृषी अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान या अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

**परदेशी अभ्यासक्रम**- आरोग्य विज्ञान, विज्ञान, कला, अभियांत्रिकी, व्यावसायिक अभ्यासक्रम यामध्ये समाविष्ट अभ्यासक्रम आहे.

**व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी** : शिक्षण पूर्ण केलेल्या अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमित परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्या रकमेचा परतावा (कमाल १२ टक्केपर्यंत) महामंडळ अदा करेल. तसेच व्याज परतावासाठी जास्तीत जास्त पाच वर्षे कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

**कार्यपद्धती** : ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर जावून भरावयाचे आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या श्रीराम समर्थ गृहनिर्माण सहकारी  सोसायटी, पहिला मजला, रुम नं १०१, मारुती मंदिरामागे, एमएसईबीजवळ, चेंढरे, अलिबाग या पत्यावर अथवा महामंडळाच्या www.msobcfdc.org संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक रायगड निशिकांत नार्वेकर यांनी आवाहन केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**

## आयपीएलमध्ये आज दुसऱ्या क्वालिफायरचा थरार

# मुंबई-गुजरात लढत रंगणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये बुधवारी झालेल्या एलिमिनेटर सामन्यात मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ८१ धावांनी दारुण पराभव केला. यासह मुंबईने दुसऱ्या क्वालिफायरमध्ये स्थान मिळवले आहे. आता मुंबईचा सामना शुक्रवारी (दि. २५) गुजरातशी होणार आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने आठ बाद १८२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात लखनऊचा संघ केवळ १०१ धावाच करू शकला. या पराभवामुळे लखनऊचा आयपीएल २०२३मधील प्रवास संपला आहे.



एलिमिनेशन सामन्यात मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ८१ धावांनी पराभव केला. या विजयासह मुंबई इंडियन्स संघाने क्वालिफायर-२मध्ये स्थान निश्चित केले. जगातील सर्वांत मोठे स्टेडियम अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये मुंबईचा सामना गतविजेत्या गुजरातशी होणार आहे. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या एलिमिनेशन सामन्यात मुंबईने लखनऊच्या विजयी घोडदौडीला ब्रेक लावला. सलग तीन पराभवानंतर मुंबईचा लखनऊविरुद्धचा हा पहिला विजय आहे. त्यामुळे लखनऊचा संघ सलग दुसऱ्यांदा प्लेऑफमध्ये पराभूत होऊन बाहेर पडला.

१८२ धावांचा पाठलाग करताना लखनऊ संघ १६.३ षटकांत १०१ धावांवर सर्वबाद झाला. २५ धावांच्या आतच संघाचे दोन्ही सलामीवीर बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतले. इम्पॅक्ट खेळाडू काईल मेयर्स १८ धावा आणि प्रेरक मंकड तीन धावा करून बाद झाला. कृणाल पांड्यालाही मोठी खेळी खेळता आली नाही. तो अवघ्या आठ धावांवर बाद झाला. यानंतर आयुष बदोनीलाही संघासाठी मोठी खेळी करता आली नाही. तो केवळ एक धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला. निकोलस पूरन गोल्डन डक बनला. लखनऊकडून धडाकेबाज खेळी करणारा मार्कस स्टॉयनिस धावबाद झाला. त्याने २७ चेंडूंत सर्वाधिक ४० धावा केल्या. यानंतर कृष्णप्पा गौतमही धावबाद झाला. रवी बिश्नोईलाही काही विशेष कामगिरी करता आली नाही. तो अवघ्या तीन धावांवर बाद झाला. यानंतर दीपक हुडा धावबाद झाला. त्याने १३ चेंडूंत एका षटकाराच्या मदतीने १५ धावा केल्या. यानंतर लखनऊच्या विकेट्स ठराविक अंतरानंतर विकेट्स पडतच राहिल्या. मुंबईच्या आकाश मधवालने शानदार गोलंदाजी करीत संघाला विजय मिळवून दिला. आकाशने ३.३ षटकांत केवळ पाच धावा देत सर्वाधिक पाच बळी टिपले.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने आठ गड्यांच्या मोबदल्यात १८२ धावा केल्या होत्या. मुंबईकडून कॅमेरून ग्रीनने सर्वाधिक ४१ धावा केल्या. त्यानंतर सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि नेहल वढेरा यांच्या उपयुक्त खेळींनी मुंबईची धावसंख्या १८० धावांच्या पुढे नेली. लखनऊकडून नवीन-उल-हकने चार बळी घेत मुंबईला २०० धावांचा टप्पा पार करण्यापासून रोखले. यश ठाकूरला तीन आणि मोहसीन खानला एक विकेट मिळाली. या सामन्यातील पराभवाने लखनऊचे प्लेऑफमध्ये पहिला विजय मिळवण्याचे स्वप्न भंगले. या संघाने गेल्या वर्षी एलिमिनेटर सामनाही खेळला होता आणि त्यात पराभव झाला होता.

# आकाश मधवालने रचला इतिहास

## १३ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये एलिमिनेटर सामन्यात पाच वेळा विजेते मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सचा एकतर्फी पराभव केला. चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर फिरकीपटूंचे वर्चस्व होते, परंतु मुंबईसाठी वेगवान गोलंदाज आकाश मधवालने शानदार गोलंदाजी करून संघाला विजय मिळवून दिला. त्याचबरोबर त्याने १३ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला.

आकाश मधवालने आपल्या धारदार गोलंदाजीने लखनऊच्या फलंदाजांना टिकून राहण्याची संधी दिली नाही. त्यामुळे लखनऊ संघाचे फलंदाज पूर्ण षटकेही खेळू शकले नाहीत. परिणामी मुंबई इंडियन्सने एकतर्फी विजय मिळवून क्वालिफायर २मध्ये प्रवेश केला. अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी त्यांचा सामना शुक्रवारी गुजरात टायटन्सशी होईल.



लखनऊविरुद्धच्या एलिमिनेटरमध्ये उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज आकाश मधवालने ३.३ षटकांत अवघ्या पाच धावा देऊन पाच बळी घेतले. त्याचबरोबर आकाशने आयपीएल प्लेऑफमधील सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रमही त्याच्या नावावर केला आहे. मधवालच्या आधी हा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या डग बॉलिंगरच्या नावावर होता, ज्याने २०१०मध्ये मुंबईत झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जसाठी डेक्कन चार्जर्सविरुद्ध १३ धावांत चार बळी घेतले होते.

यानंतर धवल कुलकर्णी आणि जसप्रीत बुमराहचे नाव येते. या दोघांच्या गोलंदाजीचे आकडे सारखेच आहेत. २०१६मध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीविरुद्ध गुजरात लायन्सकडून खेळताना धवलने चार षटकांत १४ धावा देत चार बळी घेतले होते. बुमराहने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २०२०च्या पहिल्या क्वालिफायरमध्ये ४/१४ अशी नोंद केली.

### इंजिनिअर ते खेळाडू

आकाश मधवाल मूळचा रुरकी (उत्तराखंड)चा असून इंजिनिअर आहे. २०१८च्या आधी आकाश टेनिस बॉलने क्रिकेट खेळायचा. वयाच्या २४व्या वर्षापर्यंत त्याने कसोटी क्रिकेटच्या चेंडूला स्पर्शही केला नव्हता, परंतु पाच वर्षांनंतरची कथा पूर्णपणे वेगळी आहे. आता तो मुंबई इंडियन्समध्ये जसप्रीत बुमराहसारख्या खेळाडूंमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढतोय.

# आशिया चषकाचा निर्णय आयपीएल फायनलनंतर!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेच्या यजमानपदासाठी पाकिस्तान प्रयत्न करत असताना दुसरीकडे आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) नव्या यजमानाच्या शोधात आहे. वास्तविक, एसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी गेल्या वर्षीच भारतीय संघ पाकिस्तानला जाणार नसल्याचे सांगितले होते. तटस्थ देशात हे होऊ शकते, असे ते म्हणाले होते. आता या प्रकरणात एक नवीन अपडेट आले आहे. आशिया चषकाबाबत शाह यांनी मोठे वक्तव्य केले आहे.

जय शाह म्हणाले, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि श्रीलंका क्रिकेट बोर्डाचे संबंधित अध्यक्ष २८ मे रोजी अहमदाबादला येतील. नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या टाटा आयपीएलच्या फायनलमध्ये हे सर्व सहभागी होणार आहेत. आशिया चषक २०२३बाबत भविष्यातील कृती ठरवण्यासाठी आम्ही त्याच्याशी चर्चा करू. विशेष म्हणजे त्यात पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष नजम सेठी यांचे नाव नाही.

आशिया चषक आपल्या देशात व्हावा यासाठी नजम सेठी उत्सुक आहेत. पाकिस्तानने आशिया चषक बाहेर न्यायला विरोध करीत हायब्रीड मॉडेलही देऊ केले होते. हायब्रीड मॉडेलवर स्पर्धा आयोजित करण्याचा पीसीबीचा प्रस्ताव सदस्य राष्ट्रांनी फेटाळला. पाकिस्तान आपले सर्व सामने आपल्याच देशात खेळेल, असे या मॉडेलमध्ये सांगण्यात आले होते. त्याचबरोबर टीम इंडिया आपले सामने यूएई, दुबई, ओमान किंवा श्रीलंकेत खेळू शकते.

याशिवाय बीसीसीआय पाकिस्तानशिवाय आशिया कपच्या धर्तीवर इतर आशियाई देशांसोबत टूर्नामेंट आयोजित करीत असल्याचा आरोपही पीसीबीने केला होता, मात्र बीसीसीआयने या गोष्टींचा इन्कार केला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नजम सेठी यांची भूमिका आता स्पष्ट झाली आहे की, जर पाकिस्तानमध्ये आशिया कपचे सामने झाले नाहीत. तर पाकिस्तानचा संघ आशिया कपमध्ये खेळणार नाही.

भारतात या वर्षी ऑक्टोबर ते नोव्हेंबर या कालावधीत एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होणार आहे. यापूर्वी असे वृत्त येत होते की, बीसीसीआयने अट घातली आहे की, पाकिस्तानी संघ विश्वचषकासाठी भारतात येण्यास आधी पीसीबी मान्यता देईल, त्यानंतरच पाकिस्तानच्या हायब्रीड मॉडेलचा विचार केला जाईल, परंतु आता असे काही नसल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी अंतिम निर्णय पाकिस्तान सरकार घेणार असल्याचे कळते. यासोबतच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मेगा सामना पाकिस्तानमध्ये होणार नाही, ज्याचे तटस्थ ठिकाण निश्चित केले जाईल, असा निर्णयही घेण्यात आला आहे. आयपीएल संपल्यानंतर अंतिम निर्णय एसीसी घेईल आणि वेळापत्रकही जाहीर केले जाईल, असे कळते.

### यजमानपदासाठी श्रीलंका आघाडीवर

एसीसीचे म्हणणे आहे की, यूएईमध्ये सप्टेंबर महिन्यात प्रचंड उष्णतेमुळे खेळाडूंना दुखापत होण्याची भीती आहे. अशा स्थितीत सहा देशांच्या स्पर्धेचे यजमानपद भूषविण्याच्या शर्यतीत श्रीलंका आघाडीवर आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डानेही अनेकवेळा धमकी दिली आहे की, जर भारत आशिया चषकासाठी पाकिस्तानमध्ये आला नाही, तर त्यांचा संघ या वर्षी भारतात होणाऱ्या विश्वचषकावरही बहिष्कार टाकेल.



# विराटशी पंगा घेणारा नवीन उल हक होतोय ट्रोल



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या एलिमिनेटर सामन्यात मुंबई इंडियन्सच्या संघाने लखनऊ सुपर जायंट्सचा पराभव करून क्वालिफायर २मध्ये प्रवेश केला आहे. यासह या संघाचे विजेतेपदाचे स्वप्नही अपूर्ण राहिले. आपल्या चमकदार कामगिरीनंतरही विराट कोहलीशी भांडण करणारा लखनऊचा नवीन-उल-हक त्याच्या कमेंटमुळे ट्रोल होत आहे. सोशल मीडियावर आंब्याचा फोटो शेअर करून मुंबईच्या खेळाडूंनी नवीनची खिल्ली उडवली आहे.

खरेतर या मीम्स वॉरची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा त्याचा विराट कोहलीसोबत वाद झाला. आरसीबी स्पर्धेतून बाद झाल्यानंतर नवीनने इन्स्टाग्रामवर आंबे खातानाचा फोटो पोस्ट केला होता. त्यानंतर आता मुंबई इंडियन्सच्या तीन खेळाडूंनी आंब्याचा फोटो पोस्ट करून नवीनला प्रत्युतर दिले. सध्या हे मीम्स-वॉर सोशल मीडियावर जोरदारपणे सुरू आहे.

# निवृत्तीबाबत तूर्त विचार नाही -धोनी

**चेन्नई :** इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटचा सराव आणि सामन्यांमध्ये खेळल्यामुळे शरीरावर ताण पडत असला तरी निवृत्तीबाबतचा निर्णय आपण इतक्यातच घेणार नसून विचार करण्यासाठी आठ-नऊ महिन्यांचा कालावधी असल्याचे चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंह धोनीने म्हटले. धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई संघाने क्वालिफायर-१च्या सामन्यात गुजरात टायटन्सवर १५ धावांनी मात करीत आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.











## जागतिक तायक्वांदो स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अझरबैजानमध्ये होणाऱ्या जागतिक तायक्वांदो स्पर्धेत भारतीय संघ सहभागी होणार असून याची घोषणा करण्यात आली आहे. बाकू २०२३ जागतिक तायक्वांदो चॅम्पियनशिप बाकू क्रिस्टल हॉल येथे होणार आहे. अझरबैजानची राजधानी बाकू येथे २९ मे ते ४ जून २०२३ या कालावधीत भारतीय संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहे.

बाकू येथील जागतिक तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होणाऱ्या संघाचा पीस तायक्वांदो अकादमी, स्पोर्ट्सक्यूब सेंटर फॉर एक्सलन्स, गुरुग्राम येथे एका भव्य समारंभात भारत तायक्वांदो आयोजकांनी सत्कार केला आणि त्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com